## ‘एमपीएससी’च्या सर्व पूर्वपरीक्षा सीबीटी पद्धतीने

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सर्व आगामी पूर्वपरीक्षा संगणकाधारित कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली. परीक्षांतील विलंब कमी करून भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी आयोगाने व्यापक सुधारणा सुरू केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी परीक्षांचे निकाल आणि पुढील टप्प्यांमध्ये मोठा विलंब होत असल्याने उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आयोगाने पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांत जाहीर करण्याचे नियोजन केले आहे. नुकताच जाहीर झालेला राज्यसेवा पूर्वपरीक्षेचा निकाल अवघ्या २२ दिवसांत प्रसिद्ध करण्यात आला असून यापुढे सर्व पूर्वपरीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले. **(सविस्तर पान २ वर..)**

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ३३९
www.ramprahar.com

◆ शनिवार, २७ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते रोपांची लागवड/२
नवी मुंबई स्थायी समितीची विकासकामांना मंजुरी/६
किकबॉक्सिंगमध्ये आर्या मानेची चमकदार कामगिरी/८

# युवकांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध -मुख्यमंत्री

**पुणे : प्रतिनिधी**

मराठा समाजातील युवकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी शिक्षण, कौशल्य विकास, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, उद्योजकता आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित संधी उपलब्ध करून देण्याचे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असून यासाठी सारथी संस्थेच्या माध्यमातून झालेले कार्य उल्लेखनीय आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) पुणेच्या वतीने गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. त्या सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते.



कार्यक्रमास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आमदार योगेश टिळेकर, विक्रम काकडे, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, राहुल कुल, बापूसाहेब पठारे, अभिमन्यू पवार, महापौर मंजुषा नागपुरे, ‘सारथी’चे अध्यक्ष अजित निंबाळकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,

### विविध स्पर्धा परीक्षांतील यशस्वी विद्यार्थी आणि पालकांचा सन्मान

‘सारथी’च्या माध्यमातून आतापर्यंत केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणाऱ्या परीक्षेत १४०, महाराष्ट्र लोकसेवा आयोग ११२४ आणि बँकिंग क्षेत्रात ५००हून अधिक तरुण-तरुणी यशस्वी झाले आहेत. विविध कौशल्य विकास प्रशिक्षणांतून १३ हजारांहून अधिक युवक रोजगारक्षम झाले असून दोन लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षणांचा लाभ मिळाला आहे. मराठा समाजातील आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागे राहिलेल्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार या तीन पैलूंवर आधारित धोरण राबविण्यात आले.

उच्च शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक शिक्षणासाठी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. मोठ्या शहरात होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे यासाठी वसतिगृह आणि भाऊसाहेब पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना सुरू करण्यात येऊन विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयांपर्यंत आर्थिक सहकार्य करण्यास सुरुवात झाली. उद्योजकता विकासासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ गतिमान करण्यात आले आणि व्याज सवलत सुरू करण्यात आली. या माध्यमातून पाऊणे दोन लाखांपेक्षा अधिक उद्योजक तयार झाले असून साडेसात हजार कोटी रुपयांहून अधिक कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी शासन वर्षाला १५०० कोटी देते, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. इतर मान्यवरांनीही विचार मांडले.

# कर्जतच्या जामरूंगमध्ये ढगफुटी

### सह्याद्रीच्या कुशीतील धबधबे झाले प्रवाहित

### कोरडीठाक नदीही दुथडी भरून वाहू लागली


**नेरळ : प्रतिनिधी**

एकीकडे रायगडसह राज्यातील अनेक भागांमध्ये दमदार पावसाची प्रतीक्षा असताना कर्जत तालुक्याच्या अतिदुर्गम भाग असलेल्या जामरूंग ग्रामपंचायत हद्दीतील कामतपाडा परिसरात गुरुवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ढगफुटीसदृश पाऊस कोसळला. जवळपास तासभर पडलेल्या या पावसामुळे संपूर्ण सह्याद्री पर्वतरांग पांढऱ्याशुभ्र धबधब्यांनी नटली असून परिसरातील नद्या-नालेही दुथडी भरून वाहू लागले.



कामतपाडा गावाच्या वरच्या डोंगररांगांवर एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात पावसाचा मारा होत असल्याचे दृश्य नागरिकांनी प्रत्यक्ष पाहिले. या पावसामुळे पर्वतांच्या कडेकपाऱ्यांतून अनेक धबधबे प्रवाहित झाले. फेसाळणारे पांढरेशुभ्र पाणी वेगाने खाली येऊन चिल्लार नदीला मिळाले. त्यामुळे यापूर्वी कोरडी पडलेली ही नदीही पाण्याने भरून वाहू लागली. अनेकांनी आपल्या मोबाइलमध्ये ही दृश्ये कैद केली.

## किल्ले रायगडावर आज तिथीनुसार शिवराज्याभिषेक



**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याची राजधानी आणि शिवभक्तांचे प्रेरणास्थान असलेल्या किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५३वा शिवराज्याभिषेक दिन सोहळा शनिवारी (दि.२७) मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या सोहळ्याला शुक्रवारी विविध धार्मिक कार्यक्रमांनी प्रारंभ झाला.

श्री शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीच्या वतीने १९९३पासून हा सोहळा सातत्याने आयोजित केला जात असून ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला अर्थात शनिवारी मुख्य विधी होतील. स्वागताध्यक्ष म्हणून कॅबिनेट मंत्री भरत गोगावले असून विविध प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांचेही सहकार्य लाभत आहे. या सोहळ्यानिमित्त राज्यभरातून हजारो शिवभक्त रायगडावर दाखल होण्याची शक्यता असून प्रशासनाने नियोजन केले आहे.

## ‘टीईटी’साठी विशेष दक्षता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी (दि. २८) शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षा घेतली जाणार आहे. परीक्षांमधील वाढते गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

टीईटी परीक्षेसाठी उच्चांकी राज्यात चार लाख २८ हजार १२२ उमेदवारांनी मिळून पेपर १ आणि पेपर २ मिळून एकूण सहा लाख १२५ अर्ज केले आहेत. नोंदणी केलेल्यांमध्ये दोन लाख २६ हजार २६३ कार्यरत शिक्षकांचा समावेश आहे. दोन सत्रांत ही परीक्षा घेतली जाणार आहे.

# माथेरानमधील पार्किंगचा प्रश्न सुटणार! भाजपच्या प्रयत्नांना यश

**माथेरान : प्रतिनिधी**

थंड हवेचे ठिकाण असलेले पर्यटनस्थळ माथेरान येथील पार्किंगचा प्रश्न मार्गी लागला असून पावसाळी अधिवेशनात मंत्रिमंडळाच्या बैठकीत येथील महसूल विभागाची पाच एकर जागा पार्किंगसाठी मंजूर करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.



यासाठी माथेरान भाजपच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यामध्ये भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण सकपाळ, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माथेरान व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष तथा भाजप सरचिटणीस राजेश चौधरी, शहर उपाध्यक्ष किरण चौधरी, दिनेश सुतार आदी मंडळी उपस्थित होती.

देशातील एकमेव असे वाहनमुक्त पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानला वर्षाकाठी हजारो पर्यटक भेट देत असतात. ब्रिटिश काळापासून येथे वाहनांना बंदी आहे. त्यामुळे पर्यटकांना आपली वाहने मुख्य प्रवेशार असलेल्या दस्तुरी नाक्यावर उभी करावी लागतात. अनेकदा येथे पर्यटन हंगामात वाहने उभी करण्यासाठी जागा अपुरी पडत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा घाटरस्त्यात लागतात. परिणामी मोठी वाहतूक कोंडी होते.

या गंभीर प्रश्नाबाबत मागील काही दिवसांपूर्वी माथेरान भाजप शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली व ही समस्या लवकरात लवकर सोडवावी यासाठी पत्र दिले होते. सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात माथेरान येथील वाहन पार्किंगचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माथेरानमध्ये पार्किंगची मोठी समस्या असल्याने तेथील नगरपालिकेच्या मागणीनुसार महसूल विभागाची पाच एकर जागा मुख्य पार्किंगसाठी मंजूर करण्यात आली असून आता लवकरच या ठिकाणी सुसज्ज पार्किंग तयार करण्यात येईल, असे सांगितले. यामुळे माथेरान पर्यटनस्थळावरील पार्किंगसह वाहतूक कोंडीचा प्रश्नही सुटणार आहे.

# आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत स्वस्तिका घोष चमकली



### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय महिला टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा उल्लेखनीय कामगिरी करत देशाचा गौरव वाढवला आहे. ओवेरियन सिस्ट शस्त्रक्रियेनंतर तब्बल तीन महिन्यांच्या विश्रांतीनंतर तिने केलेले हे पुनरागमन अत्यंत प्रेरणादायी ठरले आहे.

संदीप घोष यांची कन्या आणि १९५०च्या दशकातील नामवंत फुटबॉलपटू स्व. निर्मल घोष यांची नात असलेल्या स्वस्तिकाने फ्रान्समध्ये झालेल्या डब्ल्यूटीटी फीडर हेनेबाँट स्पर्धेत शानदार पुनरागमन करत आपल्या जिद्दीचा आणि कौशल्याचा प्रत्यय दिला. या यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाचे अभिनंदन करून तिला पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी तिचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष, क्रीडा प्रशिक्षक विनोद नाईक आदी उपस्थित होते.

स्पर्धेतील महिला दुहेरी गटात स्वस्तिकाने भारताच्या तनिषा कोटेचा हिच्यासह खेळत रौप्यपदक पटकाविले. **(पान २ वर..)**

## केतन अग्रवाल हत्या प्रकरण उज्ज्वल निकमांकडे!

**पुणे : प्रतिनिधी**

**खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालणार; मुख्यमंत्र्यांचे निर्देश**

पुण्यातील लोहगड किल्ल्यावर झालेल्या तरुण व्यावसायिक केतन अग्रवाल हत्याकांडाचा खटला आता फास्ट ट्रॅक कोर्टात चालवला जाणार आहे. या संवेदनशील प्रकरणात गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२६) दिले.

केतन अग्रवाल याचे वडील विशाल अग्रवाल यांनी शुक्रवारी पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपल्या मुलासाठी न्याय मागितला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी पीडित कुटुंबाला धीर देत दोषींना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही, त्यांना फाशीचीच शिक्षा मिळवून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही दिली. अग्रवाल कुटुंबाने हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याची आणि ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची केलेली मागणी मुख्यमंत्र्यांनी तत्काळ मान्य करत विधी व न्याय विभागाच्या सचिवांना यासंबंधीचे आदेश जारी करण्याचे निर्देश दिले.

## निवडक

### ऑपरेशन सिंदूरमधील शहिदांना राष्ट्रीय युद्ध स्मारकावर स्थान

**नवी दिल्ली :** काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवत पाकिस्तान आणि पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमधील दहशतवादी तळांवर कारवाई केली होती. या मोहिमेदरम्यान देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या सहा शूर जवानांची नावे प्रथमच अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहेत. या सर्व शहिदांची नावे आता राष्ट्रीय युद्ध स्मारक येथे कायमस्वरूपी कोरली जाणार आहेत, जेणेकरून त्यांच्या स्मृती अमर राहतील.

### व्हेनेझुएलामध्ये शक्तिशाली भूकंपानंतर ३९ हजारांहून अधिक लोक बेपत्ता

**कराकस :** दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएला देशाला हादरवून सोडणाऱ्या भूकंपांची भीषणता दिवसेंदिवस अधिकच गडद होत चालली आहे. ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार या महाप्रलयात आतापर्यंत ५८९ लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे, तर २,९८०हून अधिक लोक गंभीर जखमी आहेत. धक्कादायक बाब म्हणजे अद्याप ३९ हजारांपेक्षा जास्त लोक बेपत्ता असून मलब्याखालून अजूनही मदतीसाठीचे आवाज येत आहेत. कार्यवाहू राष्ट्रपती डेल्सी रोड्रिग्ज यांनी देशात आणीबाणी घोषित केली आहे.



# ‘एमपीएससी’च्या सर्व पूर्वपरीक्षा सीबीटी पद्धतीने

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) सर्व आगामी पूर्वपरीक्षा संगणकाधारित कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पद्धतीने घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली. परीक्षांतील विलंब कमी करून भरती प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी आयोगाने व्यापक सुधारणा सुरू केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयामध्ये प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना अध्यक्ष भीमनवार बोलत होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर व परीक्षा नियंत्रक सरिता बांदेकर देशमुख उपस्थित होते. अध्यक्ष भीमनवार म्हणाले की, यापूर्वी परीक्षांचे निकाल आणि पुढील टप्प्यांमध्ये मोठा विलंब होत असल्याने उमेदवारांना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आयोगाने पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांत जाहीर करण्याचे नियोजन केले आहे. नुकताच जाहीर झालेला राज्यसेवा पूर्वपरीक्षेचा निकाल अवघ्या २२ दिवसांत प्रसिद्ध करण्यात आला असून यापुढे सर्व पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

याशिवाय ज्या वर्षी परीक्षा होईल, त्याच वर्षात तिची भरती प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य आयोगाने निश्चित केले आहे. मुलाखत असलेल्या पदांची निवड प्रक्रिया ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षा असलेल्या पदांची प्रक्रिया ६ ते ७ महिन्यांत पूर्ण केली जाईल. यामुळे उमेदवारांना निश्चितता मिळून त्यांच्या करिअरवरील अनिश्चितता कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्ष भीमनवार यांनी स्पष्ट केले की, सीबीटी पद्धतीचा निर्णय केवळ पूर्वपरीक्षांसाठी लागू असेल. राज्यसेवा, गट ‘अ’, गट ‘ब’, किवा गट ‘क’ च्या मुख्य परीक्षांच्या स्वरूपात यंदा कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुख्य परीक्षा पूर्वीप्रमाणेच पारंपरिक पद्धतीने होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सीबीटी आणि नॉर्मलायझेशन ही नवी पद्धत नसून, लोकसेवा आयोगाने आतापर्यंत सुमारे १४० परीक्षा सीबीटी प्रणालीनुसार यशस्वीपणे घेतल्या आहेत. सीबीटी प्रणाली ही वैज्ञानिक, न्यायालयाने मान्यता दिलेली आणि देशभरात स्वीकारलेली पद्धत असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशातील विविध भरती संस्थांचा दाखला देताना त्यांनी सांगितले की, स्टाफ सिलेक्शन कमिशन दरवर्षी लाखो उमेदवारांच्या परीक्षा सीबीटी आणि नॉर्मलायझेशन पद्धतीने घेते तसेच रेल्वे रिक्रुटमेंट बोर्डाने सुमारे १ कोटी उमेदवारांची भरती परीक्षा याच पद्धतीने यशस्वीपणे घेतली आहे. महाराष्ट्रातील स्टेट कॉमन एंट्रन्स टेस्ट सेल (सीईटी) कडूनही अलीकडे १६.३० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा सीबीटी आणि नॉर्मलायझेशनद्वारे घेण्यात आली. तसेच नॅशनल टेस्टिंग एजन्सी मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांमध्येही हीच पद्धत वापरली जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# सानपाड्यातील धोकादायक इमारतीचा पाणीपुरवठा, ड्रेनेज खंडीत

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे विभागातील अमोली को-ऑप हाऊसिंग सोसायटी, सेक्टर ३०, सानपाडा ही C-१ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारत रिकामी न केल्याने महापालिकेने २३ जून रोजी पाणीपुरवठा व मलनिस्सारण जोडणी खंडीत केली. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लवकरच वीजपुरवठादेखील बंद केला जाणार आहे.



महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अमोली को-ऑप हौ. सो. लि., भूखंड क्र. २८, सेक्टर ३०, सानपाडा, नवी मुंबई ही इमारत २०१९-२० मध्ये धोकादायक इमारती घोषित करण्याबाबत महापालिका समितीने C-१ (अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य, तत्काळ निष्कासित करणे) या प्रवर्गामध्ये घोषित करण्यात आली आहे. C-१ प्रवर्गात मोडणाऱ्या इमारती यापूर्वी धोकादायक म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

सदर इमारतीचा वापर तत्काळ बंद करून धोकादायक इमारत रिकामी करण्याबाबत संबंधितांना या कार्यालयामार्फत नोटीस बजावण्यात आली होती, परंतु अद्याप सदर धोकादायक इमारतीतील सदनिकांचा निवासी वापर सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच C-१ प्रवर्गात मोडणाऱ्या इमारती निष्कासित/रिकाम्या करण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र. ११३५/२०१४ मधील उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार इमारतीची विद्युत जोडणी, जलजोडणी व गॅस पुरवठा खंडीत करण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने तुर्भे विभाग कार्यालय क्षेत्रात C-१ या प्रवर्गात अतिधोकादायक, राहण्यास अयोग्य, तत्काळ निष्कासित करणे प्रवर्गात मोडणाऱ्या अमोली को-ऑप हौ. सो. लि., भूखंड क्र. २८, सेक्टर ३०, सानपाडा, नवी मुंबई या इमारतीमधील सदनिकेचा रहिवास वापर बंद करून त्वरित रिकामी करण्याची कार्यवाही करण्यासाठी सदर इमारतीचा पाणीपुरवठा व मलनिस्सारण जोडणी खंडीत करण्याची कार्यवाही २३ जून रोजी करण्यात आली. सदर इमारतीचा वीजपुरवठा खंडीत करण्याची कार्यवाहीदेखील लवकरात लवकर करण्यात येणार आहे.

# कल्हे येथे रिक्षाचालकाला बेदम मारहाण; गुन्हा दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कल्हेगाव येथील जरीमरी मंदिर परिसरात रिक्षाचालक योगेश पाटणे यांना रिक्षातून खेचून लाथाबुक्क्यांनी व लाकडी काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत दिनकर कदम याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी योगेश पाटणे हे जरीमरी मंदिर, कल्हेगाव येथे राहत असून ते रिक्षा चालवतात. हेच त्यांच्या उपजीविकेचे एकमात्र साधन म्हणता येईल. आरोपी प्रशांत कदम आणि त्याच्या अनोळखी मित्राने योगेश यांना रिक्षातून खेचून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. प्रशांत कदमने लाकडी काठीने मारहाण करून त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# पावसाअभावी टोमॅटोच्या दरात वाढ; बदलत्या हवामानाचा फटका

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या सुरुवातीलाच बदलत्या हवामानाचा परिणाम भाजीपाला बाजारावर दिसून येत असून टोमॅटोच्या दरात वाढ झाली आहे. उत्पादन क्षेत्रांतील पावसामुळे आवक प्रभावित झाल्याने मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील किरकोळ बाजारात ग्राहकांना अधिक दर मोजावे लागत आहेत.

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) भाजीपाला घाऊक बाजारात गुरुवारी टोमॅटोची २,४१३ क्विंटल आवक झाली. आवक सुरू असली तरी मागणीच्या तुलनेत पुरवठा मर्यादित राहिल्याने घाऊक बाजारात टोमॅटोचा दर २६ ते ३० रुपये प्रतिकिलो इतका नोंदविण्यात आला. व्यापाऱ्यांच्या मते नाशिक, पुणे, अहमदनगर, सातारा तसेच कर्नाटकातील काही उत्पादन पट्ट्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे टोमॅटो पिकांना फटका बसला आहे. शेतांमध्ये पाणी साचणे, काढणीला विलंब होणे आणि वाहतुकीत अडथळे निर्माण होणे यामुळे बाजारात येणाऱ्या मालाचे प्रमाण कमी झाले आहे. परिणामी घाऊक बाजारातील दरांमध्ये वाढ होत आहे.



घाऊक बाजारातील दरवाढीचा परिणाम किरकोळ बाजारावरही दिसून येत आहे. मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील बाजारपेठांमध्ये टोमॅटो ५० ते ७० रुपये प्रतिकिलो दराने विकला जात आहे. दर्जानुसार आणि उपलब्धतेनुसार दर यापेक्षाही अधिक असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. पावसाळ्याच्या सुरुवातीला हवामानातील अनिश्चिततेमुळे टोमॅटोसह इतर भाजीपाल्याच्या उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवसांत हवामान अनुकूल राहून आवक वाढल्यास दर स्थिर होऊ शकतात, मात्र पावसाचा जोर राहिल्यास टोमॅटोच्या दरात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### हॉटेल व्यवसायावरही होतोय परिणाम

*दैनंदिन स्वयंपाकातील अत्यावश्यक भाजी म्हणून टोमॅटोला मोठी मागणी असते. त्यामुळे दरवाढीचा परिणाम थेट सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर होत असून हॉटेल आणि खानावळ व्यावसायिकांचाही खर्च वाढण्याची चिन्हे आहेत. बाजारातील आवक आणि हवामानाची स्थिती यावर आगामी काळातील दरांची दिशा अवलंबून राहणार आहे. सर्वांनाच पावसाची आता प्रतीक्षा आहे.*

## निवडक

### कॅश काऊंटरमधून रक्कम लंपास

**नवीन पनवेल :** दुकानाचे शटरचे कडीकोयंडा तोडून आत प्रवेश करत चोरट्यांनी कॅश काऊंटरमधील चार हजार रुपये चोरून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुनाथ बळीराम तांबोळी यांचे प्रभाकर राजे कॉम्प्लेक्समध्ये श्री कृपा गिफ्ट अँड प्लास्टिक नावाचे दुकान आहे. शटरचे कडी-कोयंडा तोडून चोरांनी आत प्रवेश केला आणि कॅश काऊंटरमध्ये ठेवलेली रक्कम चोरून नेली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

### मारहाणप्रकरणी दोघांवर गुन्हा

**नवीन पनवेल :** पनवेल रेल्वे स्टेशनबाहेरील साईबाबा पार्किंगमध्ये दुचाकी पार्क करणाऱ्या मंगल राठोडला मद्यधुंद अवस्थेतील नितीन शिंदे व अजय शिंदे यांनी मारहाण केली. नितीनने काचेची बाटली डोक्यात मारल्याने व फुटलेल्या बाटलीने वार केल्याने मंगल जखमी झाला. याप्रकरणी आरोपी नितीन शिंदे आणि अजय शिंदे यांच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल शहर पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

गुन्हे

# रबाळेत वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते पाच हजार रोपांची लागवड

**नवी मुंबई : बातमीदार**

ग्लोबल वॉर्मिंगच्या संकटावर मात करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून रबाळे येथे 'भव्य वृक्ष लागवड मोहीम २०२६' राबवण्यात आली. वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते शुभारंभ होऊन एकाच वेळी पाच हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाला बळ देणाऱ्या या मोहिमेत नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली.



संपूर्ण जग ग्लोबल वॉर्मिंग आणि अनिश्चित हवामान बदलाच्या अत्यंत गंभीर संकटाचा सामना करत आहे. उन्हाळ्यातील वाढती दाहकता, ऋतुचक्रातील अनिश्चितता आणि निसर्गाचा ढासळत चाललेला समतोल या पार्श्वभूमीवर केवळ चिंता व्यक्त करून चालणार नाही, तर प्रत्यक्ष कृती करण्याची नितांत गरज आहे. नेमका हाच विचार करून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक सुधाकर सोनवणे यांच्या संकल्पनेतून रबाळे येथे 'भव्य वृक्ष लागवड मोहीम २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तब्बल पाच हजार वृक्षांची लागवड करण्यात आली.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, माजी आमदार संदीप नाईक, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, स्थायी समिती सदस्य सुधाकर सोनवणे, समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती सभापती रंजना सोनवणे तसेच माजी नगरसेविका गौतमी सोनवणे, महापालिका उद्यान विभागाच्या उपायुक्त स्मिता काळे, ठाणे जिल्हा वन अधिकारी सचिन रेपाले, वनपरिक्षेत्र अधिकारी नरेंद्र मुठे यांच्यासह पालिका अधिकारी, वन विभागाचे कर्मचारी, पर्यावरणप्रेमी, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'एक संकल्प, निसर्ग संवर्धनाचा' हे ब्रीदवाक्य आणि 'हो, हे शक्य आहे, परिवर्तन... खडकाळ माळरानाकडून, पर्यावरण समृद्धीकडे' हा दृढ निर्धार डोळ्यांसमोर ठेवून राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते या भव्य वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आणि एकाच वेळी ५०००हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी वनमंत्री गणेश नाईक यांनी स्पष्ट केले की, 'ग्लोबल वॉर्मिंगसारख्या जागतिक संकटाला हरवायचे असेल तर अशा लोकचळवळींची गरज आहे. आज देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या "एक पेड माँ के नाम" या प्रेरणादायी आवाहनाला देशभरातील कोट्यवधी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. याच पावलावर पाऊल ठेवत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वनविभाग महाराष्ट्रात ३०० कोटी वृक्ष लागवडीचा महासंकल्प पूर्ण करत आहे. याचाच एक भाग म्हणून आज एकाच वेळी लागवड केलेली ही पाच हजारांहून अधिक झाडे उद्या मोठी होऊन या परिसराचा कायापालट करतील. त्यामुळे वृक्षांची केलेली ही लागवड केवळ एक सोहळा नसून येणाऱ्या पिढीला शुद्ध हवा आणि हिरवेगार भविष्य देणारे एक क्रांतिकारी पाऊल आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ग्लोबल वॉर्मिंगसारख्या संकटाविरुद्ध एक खंबीर लढा उभा करू, हाच आजच्या दिनी आपला खरा संकल्प असायला हवा. याप्रसंगी उपस्थित सर्व नागरिकांनी 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत 'पर्यावरण संवर्धनाची' सामूहिक शपथ घेतली. तसेच मंत्री महोदयांच्या हस्ते ही वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करण्यासाठी गेल्या १५ दिवसांपासून अहोरात्र मेहनत घेणाऱ्या नागरिकांचा विशेष सन्मान करण्यात आला.

यासोबतच रबाळे येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कांशीरामजी हिंदी विद्यालयातील पहिल्या १० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा हा संदेश घरोघरी पोहचवण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या महिला बचत गटाच्या प्रतिनिधींनाही यावेळी सन्मानित करण्यात आले.

पान १ वरुन

# आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत स्वस्तिका घोष चमकली

अंतिम फेरीपूर्वी भारतीय जोडीने फ्रान्स आणि स्वित्झर्लंडच्या मजबूत जोड्यांचा प्रत्येकी ३-० अशा सरळ सेटमध्ये पराभव करत अंतिम फेरी गाठली. अंतिम सामन्यात त्यांना अनुभवी जपानी जोडीकडून पराभव स्वीकारावा लागला आणि रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

याआधी शस्त्रक्रियेपूर्वी स्वस्तिकाने लक्झेंबर्गच्या साराह दे नुट्टे हिच्यासोबत डब्ल्यूटीटी स्टार कंटेंडर चेन्नई २०२६ स्पर्धेच्या महिला दुहेरीत उपांत्य फेरी गाठली होती. महिला एकेरी गटातही स्वस्तिकाने उत्कृष्ट खेळ करत कांस्यपदक जिंकले. बाद फेरीत तिने जर्मनीच्या सोफिया हिचा ३-२, तर युआन हिचा ३-१ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमच्या खेळाडूवर ३-१ अशी मात करत ती उपांत्य फेरीत पोहचली, मात्र सलग सामन्यांमुळे आलेल्या थकव्याचा परिणाम झाल्याने उपांत्य फेरीत तिला चायनीज तैपेईच्या बलाढ्य खेळाडूकडून पराभव पत्करावा लागला.

स्वस्तिकाने यावर्षी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर सातत्यपूर्ण यश संपादन केले आहे. तिने भारतातील महिला क्रमवारीत दुसरे स्थान मिळवले असून पंचकुला राष्ट्रीय क्रमवारी स्पर्धेचे महिला एकेरी विजेतेपदही पटकावले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर तिने भारताचे प्रतिनिधित्व करत एशियन टेबल टेनिस चॅम्पियनशिप, आयटीटीएफ मिक्स्ड टीम वर्ल्डकप, एशियन कप तसेच विविध डब्ल्यूटीटी स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

फ्रान्समधील या स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शनामुळे तिच्या जागतिक क्रमवारीतही मोठी सुधारणा झाली असून ती आता जागतिक क्रमवारीत १३२व्या स्थानावर पोहचली आहे.

या उल्लेखनीय पुनरागमनानंतर स्वस्तिकाची २७ जुलै ते २ ऑगस्टदरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय महिला संघात निवड झाली आहे. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या तीन महिन्यांत आंतरराष्ट्रीय स्तरावर दोन पदके जिंकत स्वस्तिकाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीचा उत्कृष्ट नमुना सादर केला आहे. तिचे हे यश देशातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणादायी ठरणारे असून आगामी काळात तिच्याकडून आणखी मोठ्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### यशामागे खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा मोलाचा वाटा

भारतीय महिला टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करत भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. ती सीकेटी महाविद्यालयात एमए (इंग्रजी) शाखेची विद्यार्थिनी असून शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर येथील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उभारण्यात आलेले हाय-परफॉर्मन्स टेबल टेनिस प्रॅक्टिस सेंटर हे स्वस्तिकाच्या यशातील महत्त्वाचे आधारस्थान ठरले आहे. या अत्याधुनिक सराव केंद्रात जागतिक दर्जाच्या सुविधा, आधुनिक टेबल टेनिस उपकरणे आणि उच्चस्तरीय प्रशिक्षणासाठी आवश्यक असलेले वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्रात स्वस्तिका सातत्याने सराव करत असून तिच्या यशामागे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पाठिंबा आणि तिचे वडील व प्रशिक्षक संदीप घोष यांचे मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम आहेत. त्यांच्या कुशल प्रशिक्षणामुळे स्वस्तिकाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण यश मिळवले आहे.

# उरणमध्ये खरिपाच्या भातपेरणीला वेग

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील चिरनेर, कळंबुसरे, मोठी जुई, सारडे, वशेणी यांसह नागाव, केगाव, साई या भागात पेरणीयोग्य पाऊस बरसल्याने खरिपाच्या भात पेरणीला वेग आला आहे. बैलांचे नांगर नामशेष झाल्याने शेतकरी पॉवर टिलरच्या साहाय्याने नांगरणी करत असून जया, मसूरी, इंद्रायणी वाणांची पेरणी सुरू आहे.


सध्या शेतकरी शेतीच्या मशागतीच्या आणि पेरणीच्या कामात मग्न असल्याचे दिसून येत आहे. पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकऱ्यांची पेरणीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या भागात औद्योगिकरणामुळे गोदामांचे जाळे विणले आहे.

# घोटगावात हुक्का पार्लरवर छापा

**नवीन पनवेल :** विनापरवाना हुक्का पार्लर चालवून ग्राहकांना हुक्का पुरवल्याप्रकरणी तळोजा पोलिसांनी डीआर मंकी हुक्का पार्लरवर कारवाई केली. छाप्यात १३,१९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करून मुकेश खिचड व तौहिद मंसूरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डीआर मंकी हुक्का पार्लर, हैप्पी होम बिल्डिंगसमोर, घोटगाव या ठिकाणी विनापरवाना हुक्का पार्लर चालवून ग्राहकांना हुक्का पिण्यासाठी देत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी त्या ठिकाणाहून १३ हजार १९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## दुखवटा

### सीताबाई काठावले



**मोहोपाडा :** सीताबाई चंद्रकांत काठावले यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९८ वर्षांच्या होत्या. त्यांच्यावर भाताण येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी ३० जून रोजी श्री क्षेत्र नाशिक पंचवटी येथे होणार आहे. उत्तरकार्य ४ जुलै रोजी भाताण येथील राहत्या घरी होणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, तीन मुले, सुना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

# ५६.६९ कोटींचे अमली पदार्थ नष्ट

## नवी मुंबई पोलिसांची धडक कारवाई; आतापर्यंत १६६ गुन्हे दाखल

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक अमली पदार्थविरोधी दिनानिमित्त नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने २६ गुन्ह्यांमध्ये जप्त केलेले ५६ कोटी ६९ लाख ५५ हजार १९२ रुपये किमतीचे अमली पदार्थ तळोजा येथे नष्ट केले. 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत शाळा-महाविद्यालयांत जनजागृतीसह नागरिकांसाठी ८८२८१-११२-११२ हेल्पलाइन क्रमांकही देण्यात आला आहे.




'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत अमली पदार्थांविरोधात सातत्यपूर्ण कारवाई सुरू असून आतापर्यंत १६६ गुन्हे दाखल करण्यात आले. ५७ कोटी रुपये किमतीचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. अभियानाच्या पुढील टप्प्यात जागतिक अमली पदार्थविरोधी दिनाचे औचित्य साधून समाजातील व्यसनाधिनतेला आळा घालण्याच्या उद्देशाने जप्त केलेले अमली पदार्थ शासनमान्य मुंबई वेस्ट मॅनेजमेंट कंपनी, तळोजा येथे कायदेशीर प्रक्रियेचे पालन करून नष्ट करण्यात आले.

यावेळी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे तसेच पोलीस उपआयुक्त सचिन गुंजाळ उपस्थित होते. अमली पदार्थांविरोधातील लढा अधिक प्रभावी करण्यासाठी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामार्फत 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानांतर्गत मागील दोन दिवसांत शहरातील शाळा, महाविद्यालये, गृहनिर्माण संस्था व सार्वजनिक ठिकाणी व्यापक जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आले. शाळा व महाविद्यालयांतील पाच हजार विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांकडून माहिती मिळावी यासाठी हेल्पलाइन क्रमांक सुरू करण्यात आला आहे.

यावर क्रमांकावर माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याची ग्वाही पोलीस प्रशासनाने दिली आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून भविष्यातही अमली पदार्थांविरोधातील कारवाई अधिक तीव्र, कायदेशीर आणि समन्वयात्मक पद्धतीने सुरू ठेवण्यात येणार असून नागरिकांनी निर्भयपणे आणि गोपनीयतेने माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कळंबोलीत आणीबाणीचा काळा दिवस

## लोकशाहीच्या रक्षणाची घेतली शपथ

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात आणीबाणी लागू होऊन ५१ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी, कळंबोली मंडळाच्या वतीने २५ जून हा दिवस 'आणीबाणीचा काळा दिवस' म्हणून गांभीर्यपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी लोकशाही, संविधान आणि देशाच्या लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी कटिबद्ध राहण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

देशावर लादण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१व्या वर्षानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाचे संयोजक भाजप भटके-विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. आणीबाणीच्या काळात लोकशाहीवर आलेले संकट,



संविधानिक मूल्यांचे झालेले उल्लंघन, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आलेली गदा आणि त्या काळातील अन्याय-अत्याचार याविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली. लोकशाहीसाठी संघर्ष करणाऱ्या लोकशाहीवादी नेत्यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर अरुण पाटील यांनीही आणीबाणीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. लोकशाही मूल्यांचे जतन करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमास सरचिटणीस दिलीप बिष्ट, संजय दोडके, नगरसेविका मोनिका महानवर, बायजा बबन बारगजे, दमयंती भोईर, नगरसेवक राजेंद्र शर्मा तसेच मंडळातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी लोकशाही, संविधान आणि देशाच्या लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी सदैव कटिबद्ध राहण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**नवीन पनवेल** : वावंजे गावातील शेतामध्ये आंब्याच्या झाडाला शर्टच्या सहाय्याने अनोळखी इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. पोलीस या मृत इसमाच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. अनोळखी पुरुषाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्ष असून वर्ण काळा सावळा, बांधा मजबूत, केस काळे पांढरे, चेहरा गोल आहे. शरीर मध्यम असून दाढी वाढली आणि अंगात फुल टी-शर्ट, काळसर राखाडी रंगाची पॅन्ट घातली आहे. अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सरदार वसेकर यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जेएनपीए शाळांचा कारभार साई संस्थेकडे : 'आपली व्यक्ती आपली शाळा' भावनेने पालकांमध्ये आनंद

**उरण : बातमीदार**

जेएनपीए मराठी व इंग्रजी माध्यम शाळांचा कारभार २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून डोंबिवलीच्या साई संस्थेकडे सुपूर्द करण्यात आला आहे. जेएनपीए प्रशासनाने टाकलेला विश्वास सार्थ करू, असे साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांनी सांगितले. या निर्णयामुळे पालक वर्गात आनंदाचे वातावरण आहे. शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या साई संस्था (ट्रस्ट) डोंबिवली यांच्या शैक्षणिक संकुलाकडे २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून जेएनपीए मराठी माध्यम आणि इंग्रजी माध्यम या दोन्ही विद्यालयांचा कारभार सोपवण्यात आला आहे.



या निर्णयामुळे परिसरातील पालकवर्गात आनंदाचे वातावरण असून जेएनपीएचे अध्यक्ष, सेक्रेटरी आणि साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या साई संस्था (ट्रस्ट) डोंबिवली या संस्थेच्या वतीने डोंबिवली येथे मराठी, गुजराथी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा चालवल्या जातात. गतवर्षी आणखी एक स्कूल सुरू करण्यात आले आहे. संस्था गेली १८ वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत आहे. रायगड-माणगाव येथे गेली २४ वर्षांपेक्षा अधिक काळ इंग्रजी माध्यमाचे स्कूल कार्यरत आहे. या सर्व शैक्षणिक वर्षात सर्व विद्यालयांनी शालांत परीक्षेचा १००% निकाल लावून यशस्वी परंपरा राखली आहे. मागील चार वर्षांत संस्थेच्या वतीने उरण येथे नगराजशेठ सीबीएसई इंटरनॅशनल स्कूल आणि कोल्हापूर गडहिंग्लज येथे ई.बी. गडकरी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत आहे.

गतवर्षी नरसू पाटील कॉलेज ऑफ फिजिओथेरपी या आणखी एका नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश साई संस्थेच्या शैक्षणिक संकुलात झाला आहे. साई संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली असतानाच या बाबींची देशातील अग्रगण्य जेएनपीए प्रशासनाने दखल घेतली. प्रकल्पग्रस्त असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा उदात्त हेतू ठेवून विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक भविष्य लक्षात घेऊन उरण येथील जेएनपीए वसाहत संकुलात असणाऱ्या जेएनपीए विद्यालयाच्या मराठी माध्यमासह यंदाच्या २०२६-२७ शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना सर्वांगीण शिक्षण देण्याची धुरा साई संस्थेवर सोपवली आहे.

यासंदर्भात बोलताना साई संस्थेचे अध्यक्ष नरसू पाटील म्हणाले की, मी स्वतः शिक्षक असल्याने मला शैक्षणिक क्षेत्राची चांगली जाण आहे. जेएनपीएचे अध्यक्ष, सेक्रेटरी आणि प्रशासनाने संस्थेवर विश्वास दाखवून शिक्षणाची मोठी जबाबदारी माझ्या संस्थेवर सोपवली आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला मराठी माध्यमाबरोबरच इंग्रजी माध्यमाची जबाबदारीही दिली आहे. ती पूर्ण करण्यास मी, संस्थेचे सर्व सदस्य, माझा सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी कटिबद्ध आहोत. येथील बहुसंख्य विद्यार्थी प्रकल्पग्रस्त आहेत त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना पीएपीची सवलत मिळेल. साई संस्थेच्या वतीने चालू शैक्षणिक वर्षात कोणत्याही प्रकारे फी वाढ होणार नाही. विशेष म्हणजे सरकारकडून अनुदान मिळवण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने संस्थेला परवानगी दिली आहे.

यामुळे शिक्षकांच्या वेतनामध्येही फरक पडेल व सर्व शिक्षक कायमस्वरूपी सुरक्षित राहतील. त्याचप्रमाणे सरकारच्या निकषानुसार विद्यार्थ्यांनाही मोफत शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील. आता आपल्याच कुटुंबातील एक व्यक्ती आपलीच शाळा चालवत आहे ही पालकांची भावना असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीपासून सुरक्षेपर्यंतचे प्रश्न सुटले आहेत. 'आपली व्यक्ती आपली शाळा' ब्रीदवाक्य घेऊन पालकवर्गातही आनंदाचे वातावरण आहे. जेएनपीए प्रशासनाने टाकलेला विश्वास पूर्ण करण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि मी वचनबद्ध राहू, असे नरसू पाटील यांनी सांगितले.

# पनवेलमध्ये उद्या मोफत वह्यावाटप कार्यक्रम

## प्रजापती समाज मंडळाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही १०वीपर्यंतच्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या, शैक्षणिक साहित्य व शैक्षणिक किटचे वितरण रविवारी (दि. २८) सकाळी ११.३० वाजता पनवेल येथे करण्यात येणार आहे. गेली २२ वर्षे हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे.

प्रजापती समाज विकास मंडळ, राष्ट्रीय सामाजिक संस्था एनजीओ, पनवेल, नवी मुंबई यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही इयत्ता १०वीपर्यंतच्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या, शैक्षणिक साहित्य व शैक्षणिक किटचे वितरण रविवारी सकाळी प्रियांश भेळपुरी सेंटर, पटेल हॉस्पिटलजवळ, तलावासमोर, पनवेल, नवी मुंबई येथे करण्यात येणार आहे. शिक्षणाच्या या पवित्र अभियानाला यशस्वी करण्यासाठी आणि समाजातील विद्यार्थ्यांना पुढे जाण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. समाजातील सर्व बांधवांना विनंती करण्यात येते की, आपल्या विद्यार्थ्यांना व मुलांना सोबत घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा व कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन संस्थेने केले आहे.

# पनवेलमध्ये बेकायदेशीर गॅस सिलिंडरप्रकरणी कारवाई

**पनवेल** : शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीररित्या गॅस सिलिंडर वापरून खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या चार जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. पळस्पे फाटा आणि पळस्पे गाव परिसरात पाणीपुरी, चहा, बिर्याणी व मंचुरियन विक्रीसाठी सिलिंडरचा वापर सुरू होता.

शहरातील पळस्पे फाटा, पळस्पे गाव येथे बेकायदेशीररित्या ताब्यातील गॅस सिलिंडरद्वारे शेगडी पेटवून त्यावर पाणीपुरी विक्री करणारा तसेच चहा बनवून विक्री करणारा, बिर्याणी बनवून विक्री करणारा आणि मंचुरियन बनवून विक्री करणाऱ्या अशा चार जणांविरुद्ध पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत त्यांच्याकडे वापरात असलेले बेकायदेशीर सिलिंडर ताब्यात घेण्यात आले आहेत. बेकायदेशीर गॅस वापरामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी अशी कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# पनवेल महापालिका परिसरात राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन!

## सामाजिक समतेच्या कार्याचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिका मुख्यालयात गुरुवारी (दि. २५) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षण, सामाजिक न्याय आणि बहुजन कल्याणासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचे स्मरण करण्यात आले. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिका मुख्यालयात महापालिका सदस्य गणेश कडू यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, अग्निशमन विभागाचे अधिकारी, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिक्षण, सामाजिक न्याय आणि बहुजन कल्याणासाठी त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाचा यावेळी गौरव करण्यात आला. समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असून सामाजिक समता व सर्वसमावेशक विकासासाठी त्यांचे विचार मार्गदर्शक असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

## आगरी शिक्षण संस्थेतही शाहू महाराज जयंतीचा उत्साह

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील आगरी शिक्षण संस्थेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवारी (दि. २५) छत्रपती शाहू महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व ज्युनिअर कॉलेजमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य पंकज भगत यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची प्रस्तावना गणेश नाईक यांनी केली. कार्यक्रमासाठी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाहू



महाराज जयंतीनिमित्त शाळा समिती अध्यक्ष श्रुती म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. या दिवसाचे औचित्य साधून ज्युनिअर कॉलेजमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

## फुंडे विद्यालयात विद्यार्थिनींनी उजळला अखंड इतिहास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली राजर्षी शाहू महाराजांची १५२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर मनोगते व्यक्त केली.

प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, वरिष्ठ लिपिक नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर आणि उपस्थित सेवकवृंद यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थिनी नेहा जैसवार, पूजा हासदा, नव्या घरत, आशका भिलारे आणि श्रावणी भिसे यांनी राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य सांगितले. विद्यार्थी मनोगतानंतर विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक आर. जी. शेळके यांनी शाहू महाराजांचे कार्य सविस्तर विशद केले.

कोल्हापूर संस्थानचे प्रजाहितदक्ष राजे आणि महान समाजसुधारक म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा घेतला. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सुरुवात, अस्पृश्यता निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न आणि समाजातील सर्व घटकांना समान संधी मिळाव्यात यासाठी केलेले कार्य यावर त्यांनी विविध उदाहरणे देत प्रकाश टाकला. इयत्ता १०वी अ च्या वर्गाने या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया पाटीलने केले.

# गव्हाण विद्यालयात सामाजिक न्याय दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या १५२व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून 'सामाजिक न्याय दिन' साजरा करण्यात आला. यावेळी उलवे पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

बहुजनोद्धारक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करून 'सामाजिक न्याय दिन' साजरा करण्यात आला. दीनदलितांसाठी केलेले कार्य, जातीय निर्मूलनाचा पुरस्कार, शिक्षणाचा प्रसार, शेतकऱ्यांसाठी केलेले प्रयत्न आणि सामाजिक क्षेत्रातील सततच्या कार्यामुळे शाहू महाराज बहुजनांसाठी अलौकिक कार्य करणारे प्रजाहितदक्ष लोकराजा ठरले. त्यामुळेच त्यांचा जयंती दिन 'सामाजिक न्याय दिवस' म्हणूनही साजरा केला जातो.

मोहरमची सुट्टी असल्यामुळे गायकवृंदातील विद्यार्थी आणि शिक्षक वृंद यांनी हा कार्यक्रम साजरा केला. यावेळी उलवे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक कृष्णाजी लहू पाटील, पोलीस उपनिरीक्षक दीपक कारंडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक अशोक साळवे, कॉन्स्टेबल विश्वनाथ पाटील यांच्यासह रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेजचे संजय उगले, ग्रंथपाल महेश म्हात्रे, चंद्रकांत मढवी, पारस कोळी उपस्थित होते. सहायक पोलीस निरीक्षक कृष्णाजी पाटील यांनी श्रीफळ अर्पण करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी केले.



## संपादकीय

# पासपोर्ट आणि नागरिकत्व

परराष्ट्र मंत्रालयातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने अलीकडेच केलेल्या “पासपोर्ट हा प्रवासाचा दस्तावेज आहे, नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नाही” या विधानावरून गेले काही दिवस बरीच चर्चा सुरू आहे. विरोधी पक्षांचे काही नेते आणि समाजमाध्यमांवरील चर्चेत या वक्तव्याचा अर्थ चुकीच्या पद्धतीने लावण्याचा प्रयत्न दिसून आला. परंतु वस्तुस्थिती पाहता या विधानात काहीही वादग्रस्त नाही. उलट, भारतीय कायद्यातील वास्तवच त्या अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे.

**परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्याचे विधान कायदेशीरदृष्ट्या योग्यच आहे. नागरिकत्वाचा कायदा आणि पासपोर्टसंबंधी कायदा यात स्पष्ट फरक आहे. पासपोर्ट हा एखाद्या व्यक्तीला आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी दिला जाणारा अधिकृत दस्तावेज आहे. त्याचा मुख्य उद्देश परदेशात त्या व्यक्तीची ओळख आणि राष्ट्रीयत्व दर्शविणे हा आहे. मात्र नागरिकत्वाचे निर्धारण केवळ पासपोर्टच्या आधारे होत नाही. भारतीय नागरिकत्व हे जन्माने, वंशाच्या आधारे, नोंदणी करून वा नॅचरलायझेशन म्हणजे नागरिकत्वाच्या कायदेशीर प्रक्रियेनुसार मिळू शकते. भारतातील नागरिकत्व हे नागरिकत्व कायदा १९५५ आणि त्याअंतर्गत असलेल्या विविध तरतुदींनुसार निश्चित केले जाते. जगातील अनेक देशांमध्ये अशी व्यवस्था आहे. पासपोर्ट हा महत्त्वाचा दस्तावेज असला तरी तो नागरिकत्वाचा एकमेव किंवा अंतिम पुरावा मानला जात नाही. फसवणूक, अवैधरित्या नागरिकत्व मिळवणे, पालकत्वाबद्दलच्या वादांच्या दुर्मिळ घटनांमध्ये नागरिकत्व कायद्याच्या तरतुदींनुसार नागरिकत्व ठरवावे लागते व संबंधित यंत्रणा त्याची स्वतंत्र पडताळणी करू शकतात. त्यामुळे परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने मांडलेला मुद्दा हा कायदेशीर वास्तवाशी सुसंगत आहे. दुर्दैवाने देशात नागरिकत्वाशी संबंधित विषयांवर अनेकदा राजकीय ध्रुवीकरण होते. कोणतेही विधान समोर आले की त्याचा संदर्भ बाजूला ठेवून भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न होतो. या प्रकरणातही तसेच झालेले दिसते. प्रत्यक्षात त्या अधिकाऱ्याने पासपोर्टचे महत्त्व कमी केले नाही. त्यांनी फक्त दस्तावेजांच्या कायदेशीर स्वरूपाबाबत स्पष्टीकरण दिले. केंद्र सरकारने गेल्या दशकभरात पासपोर्ट सेवा अधिक सुलभ आणि लोकाभिमुख करण्यासाठी मोठे प्रयत्न केले आहेत. देशभरात नवीन पासपोर्ट सेवा केंद्रे सुरू झाली, अर्ज प्रक्रिया ऑनलाइन झाली आणि पासपोर्ट मिळण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी झाला. केंद्रसरकारने नागरिकांच्या सोयीसाठीच हे केले आहे. मात्र राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने दस्तावेजांची अचूकता आणि विश्वासार्हता अत्यंत महत्त्वाची आहे. बेकायदेशीर स्थलांतर, बनावट कागदपत्रे आणि ओळखीसंदर्भातील फसवणूक यांसारखी आव्हाने अनेक देशांसमोर आहेत. अशा परिस्थितीत नागरिकत्व आणि ओळख पडताळणीसंदर्भातील कायदेशीर प्रक्रिया स्पष्ट ठेवणे ही सरकारची जबाबदारी आहे. या संपूर्ण वादातून एक गोष्ट स्पष्ट होते की नागरिकत्व आणि शासकीय दस्तावेज यांच्याबाबत जनजागृतीची गरज आहे. पासपोर्ट, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र, जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला यापैकी कोणताही एक दस्तावेज एकट्याने कोणाचे नागरिकत्व सिद्ध करत नाही. ही सगळी कागदपत्रे मिळून त्यांची मदत एखाद्याचे नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी होऊ शकते. यातील कोणता दस्तावेज कोणत्या उद्देशासाठी वापरला जातो याची वस्तुनिष्ठ माहिती लोकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्याच्या विधानाकडे राजकीय वादाच्या चष्म्यातून पाहण्याऐवजी कायदेशीर वास्तव म्हणून पाहिले तर त्यात वाद निर्माण करण्यासारखे काहीच दिसत नाही. देशहित, कायद्याचे राज्य आणि प्रशासकीय स्पष्टता यांना प्राधान्य देणारी ही भूमिका म्हणूनच अधिक समजून घेण्याची गरज आहे.**

# पर्यटकांचा अतिउत्साह ठरतोय जीवघेणा!

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

काही दिवसांपूर्वी मुरूड तालुक्यातील काशीद समुद्रात एका पर्यटकाचा बुडून मृत्यू झाला. तीन दिवसांपूर्वी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर बुडताना पाच जणांना जीव रक्षकांनी वाचवले, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या घटनांमुळे समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर चर्चा होऊ लागली आहे. आता समुद्रकिनाऱ्यांवर बोया आहेत, ज्यामुळे बुडणाऱ्यांपर्यंत तत्काळ पोहचून त्यांना वाचवता येते. तरीदेखील काशीद येथे पर्यटक बुडालाच. आता पावसाळा सुरू झाला आहे. त्यामुळे वर्षासहलीसाठी पर्यटक धबधब्यांवर येतील. दुर्दैवाने एखादी दुर्घटना घडली, तर पुन्हा त्याचे खापर प्रशासनावर फोडले जाईल. या दुर्घटना केवळ प्रशासनाला दोष देऊन चालणार नाही. बहुतांशवेळी अशा दुर्घटनांना पर्यटकांचा अतिउत्साह कारणीभूत होतो. पर्यटकांचा हा अतिउत्साह त्यांच्या जीवार बेततो. त्यामुळे पर्यटकांनीदेखील आपल्या उत्साहाला आवरले पाहिजे, अतिउत्साह टाळला पाहिजे.

अलिबाग येथील कुलाबा किल्ला पाहून परतताना दुर्घटना घडायच्या, परंतु नगर परिषदेने काही सुविधा दिल्यामुळे येथील दुर्घटना कमी झाल्या आहेत. मागील काही वर्षांपासून या किनाऱ्यावर जीवन रक्षक तैनात करण्यात आले आहेत. सूचना फलक लावण्यात आले आहेत. भरती सुरू झाल्यावर भोंगा वाजतो. त्यामुळे अलिबाग समुद्रात पर्यटकांचे बुडण्याचे प्रमाण घटले आहे. आता जिल्ह्यातील काही समुद्रकिनाऱ्यांवर प्रशासनाने बोया उपलब्ध करून दिले आहेत. ज्यामुळे काही पर्यटकांचे प्राण वाचले आहेत. दुर्दैवाने काशीद येथे पर्यटक बुडला. प्रयत्न करूनदेखील त्याला वाचवता आले नाही.

कोकणाच्या बाहेरून येणाऱ्या पर्यटकांना समुद्राचे जास्त आकर्षण असते. पाणी पाहिल्यानंतर त्यांचा उत्साह वाढतो. उत्साहाच्या भरात ते पाण्यात जातात, परंतु त्यांना भरती–ओहोटीची माहिती नसते. अचानक पाणी वाढते किंवा कमी होते. पाण्याचा अंदाज येत नाही. आणि दुर्घटना घडते. काही वर्षांपूर्वी मुरूड येथे १४ विद्यार्थी बुडाले होते. एकदरा खाडीच्या मुखाकडे ही मुले होती. खाडीच्या मुखाकडे पाण्याचा प्रवाह जोरात असतो याची माहिती या मुलांना आणि त्यांच्यासोबत आलेल्या शिक्षकांना नव्हती. त्यामुळे ते तेथे गेले. पाण्यात जाऊ नका असे स्थानिक घोडवाल्यांनी सांगितले असतानादेखील ही मुले पाण्यात गेली. आपल्याला पाण्याचा अंदाज नसताना खोल पाण्यात जाण्याचे टाळले पाहिजे. स्थानिक लोक सांगतात तेव्हा त्यांचे ऐकले पहिजे. केवळ जिल्हा प्रशासन आणि पोलिसांना दोष देऊन अशा घटना टाळता येणार नाही. पर्यटकांनीदेखील पर्यटनाचा आनंद घेताना अतिउत्साह टाळला पाहिजे.

आता पावसाळा सुरू झाला आहे. वर्षासहलीचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतात. रायगड जिल्ह्यातील ताम्हिणी घाट हे वर्षासहलीसाठी पर्यटकांचे आवडते ठिकाण. ताम्हिणी घाटात छोटे मोठे अनेक धबधबे आहेत. या धबधब्यांवर जाण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागत नाहीत. त्यामुळे वर्षासहलीसाठी ताम्हिणी घाट पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. महाड तालुक्यातील मांडला, केंबुर्ली, शिवथरघळ, पोलादपूर तालुक्यातील मोरझोत, रोहा तालुक्यातील सुकेळी खिंड, कर्जत तालुक्यातील आषाणे –कोषेणे, खांडस, झेनिथ, अलिबाग तालुक्यातील सिद्धेश्वर, मागणगाव तालुक्यातील देवकुंड हे धबधबे प्रसिध्द आहेत. रायगड जिल्ह्यात काही तलाव आहेत, जेथे पर्यटक पावसाळी सहलीसाठी जातात, परंतु काही अतिउत्साही पर्यटकांमुळे धबधबे व तलावांच्या ठिकाणी अपघात घडतात. असे अपघात झाले की प्रशासन या ठिकाणी जाण्यास पर्यटकांना बंदी घालते. असे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. बंदी घालून तेथील लोकांचा व्यवसाय बुडतो तसेच ज्यांना वर्षासहलीचा आनंद लुटायचा असतो त्यांच्या आनंदावर विरजण पडते. हे टाळण्यासाठी अतिउत्साही पर्यटकांना आवरले पाहिजे. ही जबबादारी प्रशासनावर न ढकलता पर्यटकांनीदेखील स्वतःला अवरले पाहिजे.

मांडला, मोरझोत, आषाणे–कोषाणे चांगले धबधबे आहेत. हे धबधबे पर्यटकांना आकर्षित करतात. या धबधब्यांवर पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात, परंतु या ठिकाणी पर्यटकांना सहज पोहचता येत नाही. पर्यटकांना पोहचण्यासाठी रस्ते नाहीत तसेच तेथे सुरक्षिततेसाठी उपयायोजना नाहीत. काही धबधब्यांपर्यंत मोठी गाडी जाऊ शकते, परंतु तेथे पर्यटक प्रवाहापर्यंत जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आपघात होण्याची शक्यता असते. अशा ठिकाणी पायवाट तयार करून तेथे सेल्फी पॉइंट तयार केल्यास अपघात टाळता येतील.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली धबधब्यात पर्यटकांसाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. संरक्षण कडे बांधण्यात आले आहेत. तशाच प्रकारचे संरक्षणकडे रायगड जिल्ह्यातील कही धबधब्यांजवळ बांधल्यास अपघात टळू शकतात. रायगड जिल्ह्यातील काही प्रमुख धबधब्यांच्या ठिकाणी जर चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या तर पावसाळी पर्यटनास चालना मिळू शकते. प्रशासन पर्यटकांच्या सुरक्षेसाठी काही उपाययोजना करते. शक्य तेथे पोलीस बंदोबस्त ठेवला जातो. हे करत असताना मर्यादा येतात. प्रत्येक पर्यटकाला सुरक्षा देता येणार नाही. त्यामुळे पर्यटकांनी स्वतःला आवरले पाहिजे. दुर्घटना टाळण्यासाठी खबरदारी घेतली पाहिजे.

# शिक्षणतज्ज्ञ व चरित्रकार द.न. गोखले

चरित्रकार, शिक्षणतज्ज्ञ, समीक्षक व शिक्षणतज्ज्ञ दत्तात्रेय नरसिंह गोखले उर्फ द. न. गोखले यांची आज पुण्यतिथी आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

दत्तात्रेय नरसिंह गोखले यांचा जन्म बिरवाडी (जि.रायगड) येथे २० सप्टेंबर १९२२ रोजी झाला. कुरुंदवाड हायस्कूलमधून १९४०मध्ये मॅट्रिक व १९५२मध्ये ‘डॉ. केतकर: व्यक्ती व वाङ्मय’ हा प्रबंध सादर करून पुणे विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली. त्यांना या विद्यापीठाचे न.चिं. केळकर पारितोषिक मिळाले. पुढच्याच वर्षी ते टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशनमधून बी.टी. परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. अनुदान संहिता सुधारण्यासाठी १९६० साली नेमलेल्या समितीचे सदस्य या नात्याने त्यांनी महाराष्ट्र शासनास अनेक सुधारणा सुचविल्या. पुढच्याच वर्षी फुलब्राइट शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेत गेलेल्या या कुशाग्र बुद्धीच्या गृहस्थाने हार्वर्ड व अन्य विद्यापीठांत जाऊन माध्यमिक शाळांचा सखोल अभ्यास केला आणि ‘अमेरिकेतील माध्यमिक शाळा’ नावाचे पुस्तक लिहिले. एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांना राष्ट्रीय



पुरस्कार लाभला व राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांचा गौरव केला गेला (१९६९). डेक्कन एज्यूकेशन सोसायटीच्या पुणे व सातारा येथील हायस्कूलमध्ये त्यांनी १४ वर्षे मुख्याध्यापकपद भूषविले व नंतर पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयामध्ये आणि मुंबईच्या कीर्ती महाविद्यालयामध्ये मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्य केले.

कुरुंदवाड व सांगली येथे शिक्षण घेत असताना त्यांची जडणघडण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रभावात झाली. सांगली येथेच त्यांनी बाबाराव सावरकर यांची जीवनकथा त्यांच्याच तोंडून कित्येक महिने ऐकली. सुमारे १०० सहकार्यांच्या व परिचितांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्याशी झालेल्या संभाषणांतून बाबारावांच्या जीवनाचे अनेक पैलू त्यांना समजले. या परिश्रमांतून १९४७मध्ये गोखले लिखित ‘क्रांतिवीर बाबाराव सावरकर’ हा ग्रंथ हा साकारला.

डॉ. गोखले यांच्या डॉ. केतकर (१९५९) चरित्राला, डॉ. पटवर्धन उर्फ माधव ज्युलियन (१९७८) चरित्राला, स्वातंत्र्यवीर सावरकर : एक रहस्य (१९८९) या व्यक्तिविमर्शाला; गांधीजी: मानव नि महामानव (१९९६) या व्यक्तिविमर्शाला आणि शुद्धलेखन विवेक (१९९३) या शास्त्र विवरणाला महाराष्ट्र राज्य पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक पुरस्कार, न.चिं.केळकर पुरस्कार इत्यादी पुरस्कार लाभलेले आहेत.

**–वि.ग. जोशी (महाराष्ट्र नायक)**

## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्रामवर रील्स की फोटो पोस्ट? कुठे मिळते जास्त रीच?

आजच्या डिजिटल युगात तरुण पिढीमध्ये ‘इन्स्टाग्राम’ची क्रेझ प्रचंड वाढली आहे. तासनतास रील्स स्क्रॉल करण्यापासून ते स्टोरी पोस्ट करण्यापर्यंत, प्रत्येक जण



या प्लॅटफॉर्मवर ॲक्टिव्ह असतो. इतकेच नाही तर अनेक सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून दरमहा लाखो रुपयांची कमाई देखील करत आहेत. पण तुम्ही कधी विचार केला आहे का, की इन्स्टाग्रामवर नेमकी कुठे सर्वात जास्त रीच मिळते? रील्स बनवल्यावर की साधे फोटो पोस्ट केल्यावर? नुकत्याच समोर आलेल्या एका रिपोर्टमध्ये इन्स्टाग्रामच्या अल्गोरिदमबाबत अत्यंत महत्त्वाची आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे.

इन्स्टाग्रामवर सध्या शॉर्ट व्हिडिओ म्हणजेच रील्सचा दबदबा असला, तरी फोटो पोस्टचे दिवस संपलेले नाहीत. फोटो आजही या प्लॅटफॉर्मच्या अल्गोरिदमचा एक अत्यंत महत्त्वाचा हिस्सा आहेत. विशेषतः आजकाल ‘कॅरोसेल पोस्ट्स’ (एकाच पोस्टमध्ये अनेक फोटो असणे) खूपच भारी कामगिरी करत आहेत. याचे कारण असे की, युजर्स अशा अनेक फोटोजच्या पोस्टवर जास्त वेळ घालवतात. लोक फोटो स्वाइप करून पाहतात, ज्यामुळे ती पोस्ट सेव्ह आणि शेअर होण्याची शक्यता कैक पटीने वाढते.

जर आपण ‘रीच’ म्हणजेच नवीन लोकांपर्यंत पोहोचण्याचा विचार केला, तर या शर्यतीत आजही ‘इन्स्टाग्राम रील्स’च सर्वात पुढे आहे. इन्स्टाग्रामचे अल्गोरिदम अशा युजर्सपर्यंत रील्स पोहोचवते, जे तुम्हाला फॉलो करत नाहीत. रिपोर्टनुसार, कमी फॉलोअर्स असलेल्या अकाऊंट्सवर रील्सची रीच सामान्य फोटो पोस्टच्या तुलनेत चक्क दोन ते तीन पट जास्त असते. म्हणूनच, जर तुम्हाला तुमचे फॉलोअर्स वेगाने वाढवायचे असतील, तर रील्स हा आजही सर्वोत्तम पर्याय आहे.

आता इन्स्टाग्रामवर दुसऱ्यांचे व्हिडिओ कॉपी–पेस्ट करून किंवा AIद्वारे बनवलेला कंटेंट टाकून व्हायरल होणे कठीण होणार आहे, कारण इन्स्टाग्राम आता टप्प्याटप्प्याने केवळ ‘ओरिजनल कंटेंट’लाच पुढे ढकलत आहे. स्वतः बनवलेल्या ओरिजनल पोस्टची रीच कॉपी केलेल्या कंटेंटपेक्षा कित्येक पटीने जास्त असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे इन्स्टाग्रामवर नुसतेच रील्स टाकण्याऐवजी योग्य रणनीती आखून कॅरोसेल पोस्ट व ओरिजनल रील्सचा ताळमेळ साधणे फायदेशीर ठरेल.

# साहित्यिक, पत्रकार शिवराम परांजपे

शिवराम महादेव परांजपे हे प्रखर राष्ट्रीय बाण्याचे साहित्यिक, पत्रकार व प्रभावी वक्ते होते. त्यांचा जन्म कुलाबा (आताचा रायगड) जिल्ह्यातील महाड येथे २७ जून १८६४ रोजी झाला. त्यांचे वडील एक यशस्वी वकील होते. शिवरामपंतांच्या आईचे नाव पार्वतीबाई.

शिवरामपंतांचे प्राथमिक शिक्षण महाड येथे माध्यमिक शिक्षण रत्नागिरीस व पुण्यास आणि महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन आणि डेक्कन कॉलेजांत झाले. रत्नागिरीच्या शाळेत विष्णूशास्त्री चिपळूणकर त्यांना शिक्षक म्हणून लाभले. पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिवरामपंतांनी प्रवेश घेतला तो विष्णुशास्त्रांच्या प्रभावातून. १८७५मध्ये गोरेगावचे गणेशपंत गोखले ह्यांची कन्या बयोताई हिच्याशी शिवरामपंतांचा विवाह झाला. १८८४मध्ये संस्कृतची जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळवून ते मॅट्रिक झाले. ही शिष्यवृत्ती मिळविणारे ते पहिले विद्यार्थी. १८९५मध्ये ते एमए झाले. या परीक्षेत त्यांना ‘गोकुळदास’ आणि ‘झाला वेदान्त’ अशी दोन पारितोषिके मिळाली. त्यानंतर पुण्यात नवीनच स्थापन झालेल्या महाराष्ट्र कॉलेजात दोन वर्षे (१८९६ १८९७) ते संस्कृतचे प्राध्यापक होते. तथापि, टिळकांच्या नेतृत्वाखालील प्रत्येक चळवळीत त्यांचे समरसतेने सहभागी होणे




**निमित्त**

या कॉलेजला अडचणीचे वाटू लागल्यामुळे त्यांना ही प्राध्यापकाची नोकरी सोडून द्यावी लागली. १८९८मध्ये उत्कट देशाभिमानाच्या प्रेरणेने त्यांनी काळ हे साप्ताहिक सुरू केले. १९०८मध्ये याच पत्रातील काही लेखांच्या आधारे सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला. या खटल्यात त्यांना १९ महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली. तथापि, १५ महिन्यांच्या बंदिवासानंतर ५ ऑक्टोबर १९०९ रोजी त्यांची मुक्तता करण्यात आली. त्यानंतर १९१० साली सरकारने त्यांच्याकडून मागितलेला १० हजार रुपयांचा जामीन देऊ न शकल्यामुळे काळ साप्ताहिक त्यांना बंद करावे लागले. १९०० ते १९०८ या कालखंडात प्रसिद्ध करण्यात आलेले काळातील निवडक निबंधांचे दहा खंडही सरकारकडून जप्त करण्यात आले. पुढे मुंबई प्रांतातील काँग्रेस सरकारच्या सदिच्छेमुळे १९३७ साली दहावा खंड व १९४६ साली बाकीचे नऊ खंड निर्बंधमुक्त झाले आणि ही संधी घेऊन १९४६ साली सर्व खंडांचे पुनर्मुद्रणही करण्यात आले.

टिळकांच्या मृत्यूनंतर १२ ऑगस्ट १९२० रोजी शिवरामपंतांनी स्वराज्य हे नवे साप्ताहिक काढले आणि त्यातून महात्मा गांधींच्या असहकारितेच्या चळवळीचा पुरस्कार केला. तथापि काळाची लोकप्रियता या साप्ताहिकाला लाभली नाही. पुढे वृद्धापकाळामुळे हे साप्ताहिक त्यांनी शंकरराव देव ह्यांच्या स्वाधीन केले (१९२७). पत्रकारिता सांभाळून लोकहिताच्या चळवळींतही त्यांनी वेळोवेळी भाग घेतला. १ मे १९२२ रोजी मुळशी सत्याग्रहात ते सहभागी झाले आणि त्यासाठी त्यांनी सहा महिन्यांचा कारावासही भोगला. सायमन आयोगाला विरोध करण्यासाठी ते पुढे आले. शिवरामपंत हे जसे थोर देशभक्त तसेच एक विदग्ध पंडित आणि शैलीकार साहित्यिक होते. १९२९मध्ये बेळगाव येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी मधुमेहाच्या विकाराने ते पुणे येथे २७ सप्टेंबर १९२९ रोजी निधन पावले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# सतत गॅस अपचनाचा त्रास होत असेल तर ‘हे’ करा

पोटावर हिंगाचा लेप लावणे हा अनेक घरांमध्ये वर्षानुवर्षे वापरला जाणारा पारंपरिक घरगुती उपाय आहे. विशेषतः लहान मुलांच्या पोटदुखीपासून ते मोठ्यांमधील अपचन, गॅस आणि पोटफुगी यांसारख्या समस्यांमध्ये हिंगाचा वापर केला जातो. आयुर्वेदातही हिंगाला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यामध्ये असलेले गुणधर्म पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात. हिंगाचा लेप तयार करण्यासाठी चिमूटभर हिंग कोमट पाण्यात घालून पेस्ट केली जाते. हा लेप नाभीभोवती आणि पोटावर हलक्या हाताने लावला जातो. तो लावल्याने गॅस आणि पोटफुगीचा त्रास कमी होण्यास मदत मिळू शकते.



अपचनामुळे होणारी पोटदुखी कमी करण्यासाठीही हा उपाय केला जातो. हिंगामध्ये पचनास मदत करणारे गुणधर्म असल्याचे मानले जाते. त्यामुळे जेवणानंतर होणारी अस्वस्थता, पोटात गुडगुड होणे किंवा जडपणा जाणवणे यामध्ये काही प्रमाणात आराम मिळू शकतो. लहान बाळांना पोटात गॅस झाल्यास किंवा पोट फुगल्यास अनेकजणं हिंगाचा लेप नाभीभोवती लावण्याची पद्धत अवलंबतात. हा उपाय करताना मात्र लेप खूप घट्ट नसावा आणि बाळाच्या त्वचेवर त्रास होत नाही ना याची काळजी घ्यावी.

हिंगाचा लेप पोटातील साठलेला गॅस, जडपणामुळे येणाऱ्या कळा कमी करण्यास मदत करतो. त्यामुळे मासिक पाळीदरम्यान काही महिलाही हा उपाय करून पाहतात, मात्र तीव्र वेदना असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. पाळीदरम्यान गॅस पोटात साठतो हिंगामुळे तो गॅस सुटण्यास मदत होते आणि पोटदुखी कमी होते. हिंगामध्ये दाहशामक गुणधर्म असतात. त्यामुळे पोटातील अस्वस्थता कमी करण्यासाठी या उपायाचा आधार घेतला जातो, मात्र हा उपाय वैद्यकीय उपचारांचा पर्याय नाही हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

हिंगाचा लेप लावताना काही खबरदारी घेणेही आवश्यक आहे. त्वचा संवेदनशील असल्यास आधी थोड्या भागावर लेप लावून पाहावा. त्वचेवर जळजळ, खाज किंवा लालसरपणा जाणवल्यास लगेच लेप काढून टाकावा. तसेच सतत पोटदुखी, उलट्या, जुलाब किंवा इतर गंभीर लक्षणे असल्यास केवळ घरगुती उपायांवर अवलंबून न राहता वैद्यकीय सल्ला घ्यावा. पोटावर हिंगाचा लेप लावणे हा एक पारंपरिक आणि सोपा उपाय असला तरी तो मर्यादित प्रमाणात आणि योग्य काळजी घेऊनच करावा.

# टीईटी परीक्षा : चेहरा दिसणे बंधनकारक!

**अलिबाग : प्रतिनिधी**

येत्या २८ जून रोजी होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी (टीईटी) महिला उमेदवारांना आता बुरखा, दुपट्टा किंवा ओढणी परिधान करण्यास बंदी नसल्याचे राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे, मात्र परीक्षा सुरू असताना वर्गखोलीतील 'लाइव्ह सीसीटीव्ही'मध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्ट दिसणे बंधनकारक असणार आहे.



महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी (टीईटी) महिला उमेदवारांना बुरखा, दुपट्टा किंवा ओढणी परिधान करण्याचे स्वातंत्र्य राहील, मात्र परीक्षा सुरू असताना वर्गखोलीत उमेदवाराचा चेहरा स्पष्ट दिसणे बंधनकारक असेल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे येत्या २८ जूनला शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षा घेतली जाणार आहे. गेल्या काही काळापासून परीक्षांमधील वाढते गैरप्रकार आणि डमी उमेदवारांचे रॅकेट पाहता परीक्षा परिषदेने यंदा सर्व परीक्षा केंद्रांवर 'लाइव्ह सीसीटीव्ही यंत्रणा' कार्यान्वित केली आहे.

अशा स्थितीत चेहरा झाकलेल्या उमेदवारांमुळे ओळख पटवणे अशक्य होते. परीक्षेची पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी ओळख आणि बायोमेट्रिक पडताळणीसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये उमेदवाराचा चेहरा स्पष्ट दिसणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांचा संदर्भ देत परीक्षा परिषदेने सांगितले की, यूपीएससी, एमपीएससी, स्टाफ सिलेक्शन कमिशन अशा विविध परीक्षांमध्येही चेहरा झाकण्याला प्रतिबंध करण्यात आला आहे.

गेल्या काही वर्षांपासून परीक्षांमध्ये कानात अतिशय लहान आकाराचे ब्लूटूथ किंवा वायफाय इअरफोन वापरून कॉपी करण्याचे प्रकार वाढले आहेत. तोंड झाकलेले असल्यास आतल्या आत कोण एकमेकांशी बोलत आहे हेदेखील समजणे कठीण होते. गैरप्रकार टाळण्यासाठीच सर्व उमेदवारांचा चेहरा, मान, तोंड आणि कान स्पष्ट दिसणे गरजेचे असल्याचे परीक्षा परिषदेने म्हटले आहे.

परीक्षा केंद्रावर प्रवेश देताना प्रत्येक उमेदवाराची बायोमेट्रिक तपासणी केली जाणार आहे. त्याचबरोबर संपूर्ण परीक्षा कालावधीत सीसीटीव्हीचे थेट प्रक्षेपण परीक्षा परिषदेच्या मुख्य नियंत्रण कक्षातून पाहिले जाणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिषदेने दिला आहे. त्यामुळे उमेदवारांनी ड्रेसकोड आणि सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेरळ महावितरण उपविभाग कार्यालयाचे आमदार महेंद्र थोरवेंच्या हस्ते उद्घाटन

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत-खालापूर तालुक्यातील वाढती लोकसंख्या, गृहसंकुले, फार्महाऊस आणि पर्यटन विकास लक्षात घेता सध्याची ३०० अँपिअर वीज क्षमता ६०० अँपिअरपर्यंत वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असून कर्जत-नेरळ विभागातील वीज यंत्रणा सक्षम करण्यासाठी ६५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी मिळाली आहे, अशी माहिती आमदार महेंद्र थोरवे यांनी दिली. त्यांच्या पाठपुराव्यानंतर मंजूर झालेल्या महावितरणच्या स्वतंत्र नेरळ उपविभागीय कार्यालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले.



दरम्यान, नेरळ-माथेरान रोडवरील हुतात्मा चौक परिसरातील पुष्कर अपार्टमेंट येथे सुरू करण्यात आलेल्या या कार्यालयामुळे नेरळ, माथेरान, कळंब, शेलू आणि सदर परिसरातील नागरिकांची कर्जत कार्यालयाकडे होणारी धावपळ आता थांबणार असून वीज तक्रारी, नवीन जोडणी, बिल दुरुस्ती आदी कामे आता नेरळमध्येच चांगल्या प्रकारे होणार आहेत.

यावेळी आमदार थोरवे यांनी कर्जतजवळील शिरसे येथे नवीन स्विचिंग स्टेशन उभारण्यात येणार असल्याची माहिती दिली. या प्रकल्पामुळे वीज वितरण अधिक सक्षम होऊन भविष्यातील वाढत्या मागणीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

# अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेजमध्ये नशामुक्त भारत अभियानांतर्गत जनजागृती

**मुरुड : प्रतिनिधी**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स मुरुड जंजिरा येथे आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी आणि अवैध तस्करी दिनानिमित्त "नशा मुक्त भारत अभियान" अंतर्गत विविध जनजागृतीपर उपक्रमांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. हा उपक्रम प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा शासकीय रुग्णालय तंबाखू नियंत्रण शाखा, राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.



या अभियानांतर्गत, व्याख्याने, घोषवाक्य लेखन स्पर्धा, निबंध लेखन स्पर्धा, वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धा अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत अमली पदार्थांच्या दुष्परिणामांवर आपली मते प्रभावीपणे मांडली.

अमली पदार्थांचे व्यसनः कारणे, परिणाम आणि प्रतिबंध" या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून रायगड जिल्हा शासकीय रुग्णालयातर्फे तंबाखू नियंत्रण सल्लागार डॉ. विकास पवार, सुशील साईकर आणि रुपेश पाटील यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. साजिद एफ. शेख म्हणाले कि, "विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीच नव्हे तर सामाजिक जाणीवही विकसित करणे आवश्यक आहे. व्यसनमुक्त जीवन हीच उज्वल भविष्यासाठीची खरी दिशा आहे."

मुख्य वक्ते डॉ. विकास पवार म्हणाले कि, "तरुणांनी योग्य मार्ग निवडला, तर समाज नक्कीच सकारात्मक दिशेने पुढे जाईल." अमली पदार्थांचे प्रकार, त्यांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांना त्यांनी व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला.

## कोकणवासीयांसाठी सुट्टीच्या दिवसांत दोन अनारक्षित गाड्या

**रोहा :** प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वे प्रशासनाकडून दिवा ते चिपळूण (कोकण विभाग) दरम्यान सुट्टीच्या दिवसांत दोन अनरक्षित विशेष गाड्या चालवण्यात येणार आहेत.

यामध्ये दिवा चिपळूण दिवा मेमू सुट्टीच्या दिवसांतील अनारक्षित विशेष गाड्या (२ सेवा) गाडी क्र. ०११६० मेमू अनारक्षित विशेष गाडी दिनांक २८.०६.२०२६ रोजी चिपळूण येथून १५.३० वाजता सुटेल आणि दिवा येथे त्याच दिवशी २३.१० वाजता पोहोचेल.गाडी क्र. ०११५९ मेमू अनारक्षित विशेष गाडी दिनांक २८.०६.२०२६ रोजी दिवा येथून २३.२५ वाजता सुटेल आणि चिपळूण येथे दुसऱ्या दिवशी ०६.३० वाजता पोहचेल.

# तटकरे महाविद्यालयाचा विद्यार्थी चेतन भोजकर ठरला गरजूंसाठी आधारवड!

**माणगाव : प्रतिनिधी**

यशाच्या शिखरावर पोहोचूनही आपल्या मातीशी, आपल्या माणसांशी आणि समाजाशी नाळ जपणारी माणसे विरळाच असतात. म्हसळा तालुक्याच्या मातीतून घडलेले आणि माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी चेतन भोजकर हे असेच एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. मंत्रालयातील वरिष्ठ पदावर कार्यरत असतानाही त्यांनी आपल्या पदाचा कधीही गर्व न बाळगता सर्वसामान्य, गरीब आणि गरजू नागरिकांच्या सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले आहे.

त्यामुळेच आज ते अनेकांसाठी केवळ अधिकारी नसून "गरीबांचा देवदूत" म्हणून ओळखले जात आहेत.



अलीकडे मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात भेट देण्याचा योग आला. त्यांच्या कार्याचा विस्तार, समाजाप्रती असलेली तळमळ आणि प्रत्येक गरजू व्यक्तीविषयी असलेली आत्मीयता अनुभवताना मन अक्षरशः भारावून गेले.

# पालीसह रायगड जिल्ह्यात पावसाची एण्ट्री; वलगनीचे मासे पकडण्यासाठी नदी-नाल्यांवर झुंबड

**पाली : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून दडी मारून बसलेल्या पावसाने अखेर जिल्ह्यात दमदार हजेरी लावली आहे. या पहिल्याच मोठ्या पावसामुळे कोरडे पडलेले नदी, नाले, तलाव आणि धरणे पाण्याने भरत आहेत. पाऊस लांबल्याने चिंतेत असलेला बळीराजा सुखावला असतानाच, दुसरीकडे खवय्यांसाठी आनंदाची बातमी आली आहे. नदी-नाल्यांना नवीन पाणी आल्यामुळे ग्रामीण भागात 'वलगणीचे' (अंडी देण्यासाठी कमी पाण्यात येणारे) मासे पकडण्याची लगबग युध्दपातळीवर सुरू झाली आहे.

१ जूनपासून समुद्रातील मासेमारी कायदेशीररीत्या बंद झाल्यामुळे खवय्यांचे डोळे गोड्या पाण्यातील मासळीकडे लागले होते, मात्र जूनचा पंधरवडा उलटला तरी पाऊस नसल्याने जलस्रोत आटले होते आणि माशांची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. आता पावसाच्या आगमनाने चित्र बदलले असून बाजारात आणि नदी-नाल्यांच्या काठावर शेतात गोड्या पाण्यातील माशांची मोठी मेजवानी सुरू झाली आहे.

सध्या चिवण्या, मळे, शिवडा, कटला, अरलय, वाम, कोलंबी, खवल आणि म्हूऱ्या यांसारखे मासे सापडत आहेत. स्थानिक लोक रात्री-अपरात्री आणि पहाटेच्या वेळी खूप मेहनतीने हे मासे पकडत आहेत. या माशांच्या विक्रीतून त्यांना चार पैसे मिळण्यास मदत होत आहे.

आम्ही अनेक दिवसांपासून पावसाची वाट पाहत होतो. पाऊस सुरू होताच नदीला नवीन पाणी आले आणि वलगणीचे मासे खाली उतरले आहेत. आम्ही जाळे आणि पाग घेऊन रात्रीचे मासे पकडत आहोत. सध्या मिळणाऱ्या बहुतांश माशांमध्ये गाबोळी असल्याने खवय्यांकडून मोठी मागणी आहे. असे मासेमार जितेश तांडेल यांनी सांगितले.

काय असते 'वलगण' किंवा 'उधवण'? पाऊस पडल्यानंतर नदी आणि खाडीतील पाणी वाढते. अशा वेळी मासे प्रजननासाठी (अंडी देण्यासाठी) नदीच्या प्रवाहाविरुद्ध पोहत शेतातील किंवा नदीकाठच्या कमी पाण्यात येतात. या प्रक्रियेला स्थानिक भाषेत 'वलगण' किंवा 'उधवण' म्हणतात.




## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **चिराग चंद्रकांत यादव** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

मिळकतीचे वर्णन-: **सागपालेखार (५५३३४०)**
**(PU-ID: २४५१४६१०७५५), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १/४४ | १ | ०.०५.८० पो.ख. ०.००.५० एकूण - **०-०६-३०** | ०.७० |
| एकूण क्षेत्र ०.०६.३० गुंठ्याचे खरेदीखत | | | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **७ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्री पुरावास आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेला कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक राहणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक - २६/०६/२०२६

सही/-
**ॲड. निलेश बाळासाहेब झंजाड**
बी-१०४ सफायर सी.एच.एस.ली. भूखंड क्रमांक ३३/३४
सेक्टर २२ कामोठे ता. पनवेल जि. रायगड - ४१०२०९
मो.क्र- : ९९२०४ ७५८०१


## हार्मनी फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिर

**माथेरान : बातमीदार**

माथेरानमध्ये हार्मनी फाउंडेशनच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन हॉटेल गुलशन येथे करण्यात आले होते. यामध्ये जवळपास शंभर पेक्षाही अधिक रुग्णांनी मोफत आरोग्य सेवेचा लाभ घेतला. हार्मनी फाउंडेशनचे संचालक नितीन कांदळगावकर, संचालिका नम्रता कांदळगावकर आणि संचालक सुभाष भोसले यांनी या स्तुत्य उपक्रमाचे उत्तम प्रकारे आयोजन करून रुग्णांची तपासणी आणि मोफत औषधे देण्यासाठी सहकार्य केले.या शिबिरासाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल,सुश्रुषा हॉस्पिटल नेरुळ,मेट्रो पोलीसआणि मिलिंद पटवर्धन यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

हार्मनी फाउंडेशनचे हे १७०वे शिबिर माथेरानला आयोजित करण्यात आले असून यामध्ये मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आदी तपासण्या करण्यात आल्या.




## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ. मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २०८ | ७ | ० - १४- ४० पो.ख. ० - ०१- ३० एकूण ० - १५- ७० | ३.०७ | १) बेबीबाई बाळाराम पाटील, २) गजानन बाळाराम पाटील, ३) रजनी बाळाराम पाटील, ४) हेमंत बाळाराम पाटील. |

पनवेल.
दिनांक : २६/०६/२०२६.

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे मोर्बे, ता. पनवेल, जि. रायगड,**

| सर्व्हे नंबर /गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ८३ | १ | ० - ४१ - ७० पो.ख. ० - ०९ - १० | ७.०६ | सौ. लता भाऊसाहेब शिंगाडे |
| | एकूण | ० - ५० - ८० | | |

पनवेल.
दिनांक : २६/०६/२०२६.

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **१४ दिवसाच्या आत** आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे - वाघाची वाडी, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड**

| सर्व्हे नंबर / हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. चौ. मी. | प्लॉट नं. | सब प्लॉट नं. | खाते क्रमांक | आकार रू. पैसे. | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| ८/३/४१ | १९.५०.०० | १२ | १/२/३ | २९१ | १९५.०० | प्रणय दिपक दळवी |

पनवेल.
दिनांक : २६/०६/२०२६.

सही/-
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ४, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.

# नवी मुंबईत उद्या पल्स पोलिओ मोहीम

## ७१६ बूथवरून ९० हजार बालकांना डोस



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रविवारी (दि. २८) राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवण्यात येत आहे. महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाने ० ते ५ वयोगटातील ८९,९६३ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून नियोजन केले आहे. भारत देश पोलिओमुक्त आहे, परंतु काही देशांमध्ये अद्याप पोलिओ असल्याने तो पुन्हा परत येऊ शकतो, यासाठी पल्स पोलिओ मोहीम राबवली जात आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ० ते ५ वर्ष वयोगटामधील अपेक्षित ८९,१६३ बालकांच्या लसीकरणाचे लक्ष्य ठेवून मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. त्याकरिता २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या क्षेत्रात ६१५ स्थायी, ७४ ट्रान्झिट व २७ फिरते मोबाईल असे एकूण ७१६ बूथ कार्यरत असणार आहेत. या लसीकरण मोहिमेसाठी मॉल, रेल्वे स्टेशन, बस स्टँड अशा वर्दळीच्या ठिकाणी ट्रान्झिट व फिरती मोबाईल पथके तयार करण्यात आली आहेत.

याविषयी वैद्यकीय आरोग्य अधिकारी राजेश म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली सिटी टास्क फोर्स समितीच्या बैठकीत नियोजनाचा आढावा घेण्यात आला. तसेच पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबवण्यासाठी वैद्यकीय अधिकारी, एनएम, एलएचव्ही, एएनएम, आशा व स्वयंसेवक यांचे प्रशिक्षण घेण्यात आले. या मोहिमेकरिता महापालिका कार्यक्षेत्रात जनजागृतीपर पोस्टर्स व बॅनर्स लावण्यात आले आहेत. या पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत ज्या बालकांनी २८ जून २०२६ रोजी डोस घेतला नसेल त्यांना पुढील पाच दिवसांत महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने ९०३ टीमद्वारे गृहभेटीमध्ये घरोघरी जाऊन डोस देण्यात येणार आहेत. याकरिता प्रत्येक टीमचे कार्यक्षेत्रनिहाय सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबईकर पालकांनी पोलिओवर मात करण्यासाठी या देशव्यापी मोहिमेत सहभागी व्हावे आणि आपल्या ० ते ५ वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकाला पल्स पोलिओ लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन महापौर सुजाता पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# नवी मुंबई स्थायी समितीची विविध विकासकामांना मंजुरी

**नवी मुंबई : बातमीदार**



महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेत आयुक्त कैलास शिंदे यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या विविध नागरी सुविधा प्रस्तावांना सभापती अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. यामध्ये उद्यानांचे सुशोभिकरण, मलनिःस्सारण वाहिन्यांची सुधारणा आणि क्रीडासंकुल दुरुस्तीच्या कामांचा समावेश आहे.

महापालिकेच्या स्थायी समिती सभेमध्ये महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या विविध नागरी सुविधा प्रस्तावांना स्थायी समिती सभापती अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेत चर्चेअंती सर्वानुमते मंजुरी प्राप्त झाली. नवी मुंबई शहराची ओळख उद्यानांचे शहर म्हणूनही केली जाते. या अनुषंगाने विविध उद्यानांचे आवश्यकतेप्रमाणे सुशोभिकरण करून नागरिकांना चांगल्या दर्जाची विरंगुळ्याची ठिकाणे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

वाशी सेक्टर ७ येथील आई-बाबा उद्यान विकसित करण्याच्या २५ लाख ९० हजार रुपयांच्या तसेच वाशी सेक्टर ६ येथील ज्ञान कलश उद्यान विकसित करण्याच्या ३० लाख ५९ हजार रुपयांच्या कामास मंजुरी देण्यात आली. सेक्टर ८, नेरुळ येथील कंडोमिनियम अंतर्गत मलनिःस्सारण वाहिन्या कमी व्यासाच्या असून नादुरुस्त झाल्या आहेत. त्यांचे चेंबर्सही खचलेले आहेत. त्यामुळे मलनिःस्सारण वाहिन्यांमध्ये अडथळा होऊन सांडपाण्याचा योग्य प्रकारे निचरा होत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. दरम्यान, या अनुषंगाने सेक्टर ८, नेरुळ येथील कंडोमिनियम अंतर्गत मलनिःस्सारण वाहिन्यांची सुधारणा करणे या कामासाठी ६३ लाख ५ हजार रुपयांच्या कामास मंजुरी प्राप्त झाली.

बेलापूर विभागातील सीबीडी सेक्टर ३ येथील राजीव गांधी क्रीडासंकुल स्थानिक नागरिकांचे व नवी मुंबईकरांचे खेळण्याचे उत्तम ठिकाण आहे. सदर स्टेडियमच्या कंपाउंड वॉलची दुरुस्ती करणे अत्यावश्यक असून २९ लाख २६ हजार रुपयांच्या कामास मान्यता प्राप्त झाली. घणसोली विभागात शांतीनगर परिसरातील गटारे व पदपथ यांची दुरवस्था झाली असून नागरिकांना रहदारीसाठी होणारा त्रास दूर करण्याच्या दृष्टीने तेथे ३७१ मीटर लांबीचे व ०.७० मीटर रुंदीचे गटार बांधणे तसेच ३५६ मीटर लांबीचे व ४ मीटर रुंदीचे पदपथ बांधण्याच्या कामास आणि त्यापोटी ८९ लाख ६२ हजार रुपये खर्चास मंजुरी प्राप्त झाली.

त्याचप्रमाणे घणसोली विभागात बाळाराम वाडी येथील एका भागात गटार नसल्याने पाण्याचा निचरा होत नाही व पाणी रस्त्यावर जमा होते. ही बाब लक्षात घेऊन या ठिकाणी १३० मीटर लांब व १.१० मीटर रुंद गटार बांधण्याच्या कामास व त्यापोटी ३१ लाख १२ हजार रुपये रकमेस स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली.

# सचिन साठे यांचे दांडफाटा येथे स्वागत



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी पुणे ते मुंबई निघालेल्या पदयात्रेदरम्यान साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे नातू व अण्णा भाऊ साठे क्रांती फोर्सचे महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय अध्यक्ष सचिन साठे आणि गणेश भगत यांचे दांडफाटा येथे भव्य स्वागत करण्यात आले. घोषणांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला होता.

आरक्षण उपवर्गीकरणासाठी पुणे ते मुंबई पदयात्रा सचिन साठे यांच्या मार्गदर्शनाखाली निघाली होती. दांडफाटा येथे आली असता रसायनी परिसरातील अण्णा भाऊ साठे क्रांती फोर्स संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष कृष्णा झोंबाडे व वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संदीप मुंढे यांनी सचिन साठे यांचे पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन फटाक्यांच्या आतषबाजीत स्वागत केले. यावेळी रसायनी तसेच कोकण विभागातून कृष्णा झोंबाडे यांच्या माध्यमातून आरक्षण उपवर्गीकरणाला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत आहे. दांडफाटा येथे 'आरक्षण आपल्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं', 'आरक्षणाचे वर्गीकरण झालेच पाहिजे', 'जय लहुजी जय अण्णा भाऊ' या घोषणेने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. दरम्यान, या पदयात्रेत रसायनीतील मातंग समाजाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# लायन्स पार्कमध्ये योगा प्लॅटफॉर्म आणि निवारा शेडचे लोकार्पण

## आमदार मंदा म्हात्रे यांचे प्रयत्न

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीतून सीबीडी बेलापूर सेक्टर-३ए येथील लायन्स पार्क उद्यानात उभारण्यात आलेल्या भव्य योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेडचे लोकार्पण शुक्रवारी अशोक गुरखे यांच्या हस्ते करण्यात आले. २५ लाख रुपये खर्चाच्या या सुविधेमुळे नागरिकांना वर्षभर योगाभ्यास व सामाजिक उपक्रमांसाठी हक्काची जागा उपलब्ध झाली आहे.

आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी उपक्रम राबवण्यात आल्याचे आमदार म्हात्रे यांनी सांगितले. काही महत्त्वाची कामे सीबीडी बेलापूर परिसरात हाती घेण्यात आली आहेत. त्यात सेक्टर-८ येथील कस्तुरबा उद्यानात योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड उभारणे, सेक्टर-८ येथील नागेश्वर मंदिर परिसरात योगा प्लॅटफॉर्म व सभामंडप तसेच सेक्टर-८ येथील गौरव क्रीडा केंद्रासमोर योगा प्लॅटफॉर्म व निवारा शेड या कामांचा समावेश असून ही कामे आमदार निधीतून करण्यात येणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

यावेळी नगरसेविका स्वाती गुरखे, नगरसेविका सुरेखा नरबागे, नगरसेवक जयाजी नाथ, माजी नगरसेवक अशोक गुरखे, भाजप नेते व महामंत्री निलेश म्हात्रे, सीबीडी पोलीस ठाण्याचे वपोनि अरुण पवार, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते गोपाळराव गायकवाड, मंडळ अध्यक्ष अजय सिंग, योग संस्था सदस्या सरिता पवार, एल. जी. वार, प्रभाकर कांबळे, दामोदर पिल्ले, आरती राऊळ, रेखा गोदाम, ज्योती पाटील, अलका कामत, जयराम पासवान, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, वेतालेश्वर मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कोळी, डोलकर मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष तुकाराम कोळी, मनेश बिजलानी, राजू कोळी, समीर मनोरे, इजाज खान, जयसिंग पवार, मनोज म्हात्रे, नम्रता पवार, संजय ओबेरॉय, सिमरन शर्मा तसेच ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सचिन धुळे बजरंग दल महाराष्ट्र राज्य संघटन मंत्रीपदी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यावर्त संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यकर्ता नियुक्ती मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात दिनेश पाटील यांनी सचिन धुळे यांची महाराष्ट्र राज्य संघटन मंत्री या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करून त्यांना संस्थापक अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना दिनेश पाटील म्हणाले, हे पद देव, देश व धर्माच्या रक्षणासाठी आहे. लव्ह जिहाद, लँड जिहाद, एज्युकेशन जिहादविरोधात तसेच गोरक्षा, धर्मरक्षा, काशी-मथुरा मुक्तीसाठी हे पद आहे. श्री मलंगगड, दुर्गाडी किल्ला मुक्तीसाठीही संघटना लढा देईल. जनसंख्या नियंत्रण बिल, समान नागरी कायदा लागू करणे, हिंदू मंदिरे सरकारी नियंत्रणातून मुक्त करणे या प्रमुख मागण्या आहेत. यावेळी नवनियुक्त संघटन मंत्री सचिन धुळे यांनी पदाची जबाबदारी स्वीकारून देव, देश, धर्म रक्षणासाठी पूर्ण ताकदीने कार्य करण्याची ग्वाही दिली.

# अडीच वर्षांच्या चिमुरडीला आईकडून लाथेने मारहाण; व्हिडीओ व्हायरल

**पनवेल : वार्ताहर**

शाळेत रडते म्हणून संतापाच्या भरात आईने अडीच वर्षांच्या पोटच्या मुलीला अंगणवाडीच्या दारातच लाथेने मारहाण केल्याची घटना नांदगाव परिसरात घडली. घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर संतापाची लाट उसळली असून मुलीला वैद्यकीय तपासणीनंतर बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले आहे.



नव्यानेच अंगणवाडीत जाणारी अडीच वर्षांची चिमुरडी शाळेत रडते म्हणून रागाच्या भरात पोटच्या मुलीला लाथेने मारहाण केल्याची घटना पनवेल तालुक्यातील नांदगाव परिसरात घडली. यासंदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताच अनेकांनी संताप व्यक्त करून संबंधित मातेवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गेल्या सहा दिवसांपासून ही अडीच वर्षांची चिमुरडी शाळेत जात होती, परंतु शाळेमध्ये तिचे मन लागत नव्हते. त्यामुळे ती सतत रडायची. कालही तिची आई तिला सोडायला गेली असताना ती रडायला लागल्याने अंगणवाडीच्या दारात तिने मुलीला लाथेने मारले.

हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. याची दखल पोलीस खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली व तातडीने सदर मुलीच्या कुटुंबीयांना पोलीस ठाण्यात आणून मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सदर मुलीला तिच्या आईसह सध्या शासनाच्या बालकल्याण समितीसमोर हजर करण्यात आले आहे. या घटनेमुळे पालकवर्गामध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, सदर महिलेने घडलेल्या घटनेबाबत दिलगिरी व्यक्त केली आहे.

# पोलीस असल्याचे सांगून फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

पोलीस असल्याचे सांगून थकीत रक्कम वसूल करून देण्याच्या बहाण्याने चार लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात २४ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डिसेंबर २०२५ ते २०२६ या कालावधीत आरोपी प्रणव उर्फ संतोष वाळुंजे (राहणार तळोजा), महादेव कोंडीलकर (राहणार जांभिवली), नथुराम पवार (राहणार रसायनी) यांनी पोलिसांचे कपडे घालून फिर्यादी सत्यवान वसंत घरत (राहणार आर वन, करंजाडे) यांना पोलीस असल्याचे भासवले.

आरोपींनी फिर्यादी सत्यवान घरत यांचे लोकांकडे असलेली रक्कम काढून देतो, असे सांगून त्याबदल्यात त्यांच्याकडून दोन लाख रुपये घेतले. त्यानंतर कोणतीही रक्कम वसूल करून न देता त्यांची फसवणूक केली आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून दत्त मंदिरासाठी एक लाखांची देणगी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील देवळी येथील १९७८पासूनचे पुरातन व ऐतिहासिक वारसा लाभलेले श्री दत्तप्रभूंचे मंदिर संपूर्ण पंचक्रोशीत भाविकांचे श्रद्धास्थान आहे. सध्या या मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम ग्रामस्थांच्या वतीने हाती घेण्यात आले आहे. याकामी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक लाख रुपयांची आर्थिक देणगी जाहीर केली आहे.

यावेळी रायगडभूषण अरुण शिवकर, देवळी गावचे माजी सरपंच आणि विद्यमान सदस्य किरण तुरे, आदर्श शिक्षक हिरामण तांडेल, सेक्रेटरी सुधाकर तुरे यांच्यासह अन्य मान्यवर आणि देवळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, देणगी जाहीर केल्याबद्दल देवळी ग्रामस्थांनी यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आभार मानले.

# साडेबारा टक्के योजनेला वेग

## सिडकोतर्फे विशेष शिबिरांचे आयोजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**




राज्य सरकारने ३६ वर्षांपूर्वी घोषित केलेल्या आणि ३२ वर्षांपूर्वी अमलात आणलेल्या सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेंतर्गत प्रलंबित भूखंड वाटपाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहचली आहे. सिडकोने ६ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान शिबिरांचे आयोजन केले असून तत्पूर्वी प्रकल्पग्रस्तांना आवश्यक कागदपत्रांसह सिडको भवनात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

शासनाच्या २२ मेच्या निर्देशानुसार प्रलंबित भूखंड वाटप पूर्ण करण्यासाठी जुलै आणि ऑगस्ट महिन्यात विविध नोडनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर योजनेची उर्वरित प्रक्रिया पूर्ण करण्याचा सिडकोचा प्रयत्न आहे. सिडकोने गुरुवारी प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेनुसार द्रोणागिरी, जेएनपीए, कामोठे-आसूडगाव, करंजाडे-कालुंद्रे, तळोजा-खारघर-नावडे, कळंबोली-रोडपाली व ठाणे नोडसाठी ६ जुलै ते २२ ऑगस्टदरम्यान शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत.

लाभार्थी भूधारकांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी २ ते ५ या वेळेत सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनातील भूमी १२.५ टक्के विभागात आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरांसाठी निवाडा, कब्जेपावती, ७/१२ उतारा, रहिवासी दाखला, आधार, पॅन, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड तसेच वारस, मृत्यू दाखला, हमीपत्र, बंधपत्र आणि प्रतिज्ञापत्र आदी कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. संबंधित कागदपत्रांची साक्षांकित किंवा नोटराईज्ड प्रत सादर करण्याच्या सूचनाही सिडकोने दिल्या आहेत.

पनवेल, उरण आणि नवी मुंबई परिसरातील ९५ गावांतील भूधारकांच्या पुनर्वसनासाठी राबविण्यात येणारी साडेबारा टक्के योजना अंतिम टप्प्यात असून एकूण ९०४.४२ हेक्टरपैकी ८८७.६० हेक्टर क्षेत्राचे म्हणजेच ९८.१४ टक्के भूखंड वाटप पूर्ण झाले आहे. उर्वरित वाटपासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू आहे. सध्या ही योजना अंतिम टप्प्यात पोहचली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन करून त्या जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के योजनेत विकसित भूखंड देणारी ही योजना होती. ही योजना लागू करण्यासाठी दि. बा. पाटील यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या आंदोलनात अनेकांचे प्राण गेले.

दोन वर्षांत माजी व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्या कारकीर्दीत चार संगणकीय सोडतीद्वारे १६ नोडमधील ७३३ भूधारकांना चार लाख ७५ हजार ५०७ चौरस मीटर क्षेत्राचे भूखंड वाटप करण्यात आले आहे. सिडकोने दीर्घकाळ प्रलंबित प्रकरणे संचालक मंडळाच्या मान्यतेने निकाली काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सिडकोच्या कारभाराची सूत्रे हाती घेतलेल्या व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्‌गल यांच्या नेतृत्वाखाली उर्वरित पात्र लाभार्थ्यांना लाभ लवकर मिळण्यासाठी सिडको प्रयत्नशील असल्याचे सांगितले जात आहे.



**पनवेल : भाजप कामगार आघाडीचे कार्यालयीन सचिव मधुकर उरणकर यांना वाढदिवसानिमित्त शुक्रवारी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. भाजप पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात त्यांचा अभीष्टचिंतन सोहळा झाला. यावेळी जिल्हा संयोजक रवी नाईक, के.सी.पाटील, राजपाल शेगोकार, बाळाराम पाटील, अरुण धांदर, नंदा धांदर, राजीवन कुमार, एन.डी. गव्हाणकर, माजी सरपंच विनेश कदम, रूपेश फडके, शशी कुमार, ललिता शेवाळे, माजी नगरसवेक जगदीश उरणकर, रमेश साष्टे आदींनीही उरणकर यांना शुभेच्छा दिल्या.**

# महाडला उद्या सामाजिक न्याय परिषद

## ◆ केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांची लाभणार उपस्थिती

**महाड : प्रतिनिधी**

विवेक विचार मंच, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ लोणेरे आणि सहयोगी संघटना महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने महाड येथे २८ जून रोजी राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेला विशेष अतिथी म्हणून केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार व संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू उपस्थित राहणार असल्याची माहिती सामाजिक न्याय परिषद स्वागत समितीचे अध्यक्ष ॲड.संजय भिसे, आप्पासाहेब पारधे, निलेश धायरकर यांनी दिली.

महाड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित पत्रकार परिषदेमध्ये सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन कशा प्रकारे करण्यात येणार आहे याची माहिती देण्यात आली. त्यावेळी समितीचे पदाधिकारी बोलत होते.



राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती आणि सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने महाड येथे २८ जून रोजी एकदिवसीय राज्यस्तरीय सामाजिक न्याय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. या परिषदेला केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह महाराष्ट्राचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे मंत्री संजय शिरसाठ, नगर विकास आणि सामाजिक न्याय विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पद्मश्री दादा इदाते, ज्येष्ठ साहित्यिक आणि लेखक डॉ. शरणकुमार लिंबाळे, 'बार्टी'च्या प्रभारी महासंचालक दीपा मुधोळ मुंडे, अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था व्यवस्थापकीय संचालक सुनील वारे, लोणेरे येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आधी मान्यवरांसह संपूर्ण राज्यातील २५०पेक्षा अधिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी निलेश धायरकर म्हणाले की, राज्यातील वंचित घटकांमध्ये कार्य करणाऱ्या संस्था संघटनांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र यावे, संवाद साधावा आणि सर्वांच्या समन्वयाने व सहकार्याने आवश्यक सामाजिक कार्य अधिक गतीने व्हावे या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात येते.

समतेच्या विषयात कार्य करणाऱ्या संस्था तसेच सामाजिक कार्यकर्त्यांच्या कार्याच्या गौरव व्हावा आणि त्यांच्या सामाजिक कार्यरत प्रोत्साहन मिळावे या हेतूने विवेक विचार मंचाच्या वतीने राज्यातील १० संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांना छत्रपती राजर्षी शाहू महाराज सामाजिक न्याय पुरस्कार देण्यात येईल.

# रातवड विद्यालयाच्या दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी स्कूलबस

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व सुलभ शैक्षणिक प्रवासासाठी प्राप्त झालेल्या टाटा विंगर स्कूल बसचे उद्घाटन अत्यंत उत्साहात आणि आनंदमय वातावरणात झाले. सुमन रमेश तुलसीयानी चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने विद्यालयाला ही स्कूल बस प्राप्त झाली असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वाहतुकीची गरज पूर्ण होणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मनीष रूपानी (हेड ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड प्रोजेक्ट, तुलसीयानी ट्रस्ट), कृष्णा महाडिक (सामाजिक कार्यकर्ते, नाना पालकर स्मृती समिती), सुनील पाटील (शालेय समिती अध्यक्ष), प्रवीण पाटील (सहसचिव, नाना पालकर स्मृती समिती) संजय बांगर (पोलीस निरीक्षक माणगाव) दीपक जाधव,सतीश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले तसेच विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांनी मान्यवरांचे स्वागत करून ट्रस्टचे विशेष आभार मानले. या बसमुळे आठ गावांतील व आदिवासी वाड्यांमधील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित शेडगे यांनी केले.



# मुख्याधिकारी संतोष माळींना पदोन्नती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांना मुख्याधिकारी गट-'अ'पदी पदोन्नती मिळाली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.



संतोष माळी हे माणगाव नगरपंचायतीत मुख्याधिकारी म्हणून गेली काही वर्ष काम करीत आहेत. प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करताना त्यांनी नगरपंचायतीत विशेष अशी आपली छाप पाडून माणगावकरांशी ऋणानुबंधाचे संबंध जोडले. शहरातील स्वच्छता, गटारलाईन, पिण्याच्या पाण्याची योजना, पाण्याची पाईपलाईन; याचबरोबर शहरातील महामार्गावर असणारी अतिक्रमणे हटविणे यामध्ये पुढाकार घेऊन काम केले आहे. शासनाच्या स्वच्छता अभियान कार्यक्रम त्यांनी नागरपंचायतीतफे माणगाव शहरात प्रभावीपणे राबविले आहे.

शासनातर्फे माळी यांना पदोन्नती देण्यात आली असून मुख्याधिकारी गट-'अ'पदी नियुक्ती मिळाली आहे. याबद्दल नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे, उपनगराध्यक्ष रिया उभारे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, नगरसेवक राजेश मेहता, कपिल गायकवाड, नगरसेविका लक्ष्मी हिलम, माजी नगरसेवक नितीन वाढवळ, सुनील पवार आदींनी माळी यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## अमृतपेठ थेट बाजारपेठ उपक्रम

**अलिबाग** : महाराष्ट्र संशोधन, उन्नती प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थेचा अमृतपेठ थेट स्वदेशी बाजारपेठ उपक्रम रायगड गोरेगाव येथे होत आहे. संबोधी बौद्ध विहारात २७ व २८ जून रोजी सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत ही बाजारपेठ खुली असणार आहे.

यावेळी लकी ड्रॉ कूपन काढून विजेते निवडून त्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी रायगड जिल्हा व्यवस्थापक (९११२२२८७५९) शैलेश मराठे (९४२३८९२१८२), मंगेश ढेबे (८१४९५५२१४३), सुयश मोने (९५२७११०२६६) यांच्याशी संपर्क साधावा.

# मध्य रेल्वे चार विशेष साप्ताहिक गाड्या चालवणार

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन मध्य रेल्वे मुंबई ते करमळी आणि नागपूरदरम्यान चार विशेष साप्ताहिक गाड्या चालविण्यात येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-करमळी-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष साप्ताहिक गाड्या (दोन सेवा)पैकी गाडी क्र. ०११२९ विशेष साप्ताहिक ही २६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.२० वाजता सुटेल आणि करमळी येथे त्याच दिवशी २.४० वाजता पोहचेल, तर गाडी क्र. ०११३० विशेष साप्ताहिक ही २८ जून रोजी करमळी येथून ४.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ५.२५ वाजता पोहचेल.

या गाडीला दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरावली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवी हे थांबे देण्यात आले आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष साप्ताहिक गाड्या (दोन सेवा)पैकी गाडी क्र. ०१०२१ विशेष साप्ताहिक गाडी ही २७ जून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.४५ वाजता पोहचेल, तर गाडी क्र. ०१०२२ विशेष साप्ताहिक ही २७ जून रोजी नागपूर येथून १०.४० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १३.५० वाजता पोहचेल.

या गाडीला दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा हे थांबे देण्यात आले आहेत.

गाडी क्रमांक ०११२९, गाडी क्रमांक ०१०२१ आणि गाडी क्रमांक ०१०२२साठी आरक्षण सर्व पीआरएस केंद्रांवर आणि आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर (www.irctc.co.in) उपलब्ध आहे. सामान्य दरांसह अनारक्षित डब्यांचे बुकिंग यूटीएस प्रणालीद्वारे करता येईल. प्रवासी तिकीट बुकिंगसाठी 'RailOne' ॲपदेखील डाउनलोड करू शकतात.या विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील सविस्तर वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीइएस ॲप डाऊनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले आहे.

## आक्षी-नागाव मार्गावर एसटी बससेवा पूर्ववत सुरू करा

### डॉ. सचिन राऊळ यांची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आक्षी-नागावमार्गे धावणारी राज्य परिवहन महामंडळाची बस गेल्या काही महिन्यांपासून बंद असल्याने विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, नोकरदार तसेच पर्यटकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. ही बससेवा तत्काळ पूर्ववत सुरू करण्यात यावी, अशी मागणी रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य डॉ. सचिन शरद राऊळ यांनी अलिबाग आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सुरक्षेचे कारण पुढे करून आक्षी-नागाव मार्गावरील एसटी बससेवा बंद करण्यात आली असली तरी याच मार्गावरून खासगी बसेस, पर्यटक वाहने, मालवाहतूक वाहने तसेच विविध प्रकल्पांची वाहने नियमितपणे धावत आहेत. त्यामुळे केवळ सर्वसामान्य जनतेसाठी असलेली एसटी सेवा बंद ठेवण्याचे कारण नागरिकांना पटत नाही.

शाळा व महाविद्यालये सुरू होत असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एसटी बस हे शिक्षणासाठीचे प्रमुख आणि परवडणारे वाहतुकीचे साधन आहे, मात्र बससेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असून त्यांचा वेळही वाया जात आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गालाही दैनंदिन प्रवासासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

याशिवाय चौल-आग्राव रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे या मार्गावरील एसटी बससेवा तसेच रेवदंडा-कल्याण बससेवा पुन्हा सुरू करण्याची मागणीही डॉ. राऊळ यांनी केली आहे.

## डी.फार्ममध्ये 'भाएसो'चे यश

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील भारतीय एज्युकेशन सोसायटी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतील विद्यार्थ्यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या डिप्लोमा इन फार्मसी (डी. फार्म) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

प्रथम वर्ष डी. फार्म परीक्षेत संस्थेचा एकूण निकाल ८८ टक्के लागला. यामध्ये विघ्नेश राजेश खर्साईकर याने ८४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सौरभ दिनेश गुप्ताने ८२.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर आर्यन अंकुश दबडेने ७९.१० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

द्वितीय वर्ष डी. फार्म परीक्षेत संस्थेचा एकूण निकाल ७८ टक्के लागला. यामध्ये मनाली एच. मांडवकर हिने ८६.०९ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. पुरुषोत्तम एस. म्हात्रेने ८२.०९ टक्के गुणांसह द्वितीय, तर जिविका जे. धामणसेने ८१.८२ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिक जैन, प्राचार्य डॉ. आशिष पगारिया, विभागप्रमुख अनघा सामंत तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शेती व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड

महाराष्ट्रातील शेती व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन बळीराजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या गतिमान आणि तंत्रज्ञानस्नेही नेतृत्वाखाली राज्य शासनाने चालू आर्थिक वर्षात राज्यातील तीन प्रमुख कृषियंत्रीकरण योजनांसाठी तब्बल १०५६.३१ कोटी रुपयांचा भरीव निधी थेट वितरित केला आहे. शासनाने राज्यातील शेती क्षेत्राचा कायापालट करण्यासाठी आणि बळीराजाला प्रगतीपथावर नेण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यावर विशेष भर दिला आहे. पारदर्शकता आणि वेगवान अंमलबजावणी ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये या निर्णयातून पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहेत.

पारंपरिक शेतीला शाश्वत आणि फायदेशीर बनवण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून घेतलेला हा निर्णय राज्यातील कृषी क्षेत्राचा चेहरामोहरा बदलणारा ठरणार असून, यामुळे शेतकऱ्यांच्या कष्टात कपात होऊन उत्पादकतेत मोठी वाढ होणार आहे.

राज्यात शेतीचे यांत्रिकीकरण वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून तीन वेगवेगळ्या योजना राबविल्या जात आहेत. यामध्ये केंद्र पुरस्कृत कृषियंत्रीकरण उपअभियान, राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्य पुरस्कृत कृषियंत्रीकरण योजनेचा समावेश आहे.

केंद्र पुरस्कृत कृषियंत्रीकरण उपअभियान (Sub-Mission on Agricultural Mechanization - SMAM) ही शेतीमध्ये आधुनिक यंत्रांचा वापर वाढवून शेतकऱ्यांचे श्रम आणि खर्च वाचवण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनातर्फे राबवली जाणारी एक अत्यंत महत्त्वाची योजना आहे. सध्या ही योजना राष्ट्रीय कृषी विकास योजनेचा (RKVY) एक भाग म्हणून राबवली जात आहे. यांत्रिकीकरणाला चालना: अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक शेती यंत्रे पोहचवणे. उत्पादकतेत वाढ: आधुनिक अवजारांच्या साहाय्याने वेळेची बचत करणे आणि पिकांची उत्पादकता वाढवणे. भाडे तत्त्वावर सुविधा: महागडी यंत्रे स्वतः खरेदी करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'कस्टम हायरिंग सेंटर्स' (औजारे बँक) उभारण्यास प्रोत्साहन देणे. ही याजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. ही एक केंद्र पुरस्कृत योजना असून, यामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारचा वाटा खालीलप्रमाणे विभागला गेला आहे. केंद्र शासनाचा ६०% तर राज्य शासनाचा ४०% वाटा आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रवर्गांनुसार ४०% ते ५०% पर्यंत अनुदान दिले जाते. या अभियानांतर्गत ट्रॅक्टर आणि पॉवर टिलर (ट्रॅक्टरसाठी साधारणपणे ₹२ ते २.५ लाखांपर्यंत कमाल अनुदान मर्यादा असते), स्वयंचलित यंत्रे: रिपर, रिपर कम बाइंडर, पॉवर वीडर (इंजिन ऑपरेटेड). ट्रॅक्टर चलित अवजारे रोटाव्हेटर, पलटी नांगर, पेरणी यंत्र (सीड ड्रील), मळणी यंत्र (थ्रेशर), कॉटन श्रेडर, ट्रॅक्टर माऊंटेड स्प्रेयर. काढणीपश्चात तंत्रज्ञानाची मिनी राईस मिल, मिनी दाल मिल, क्लीनर कम ग्रेडर, पॅकिंग मशीन इत्यादी. आधुनिक तंत्रज्ञानातील कृषी ड्रोन (Kisan Drone) आणि हाय-टेक शेती साधने. महागडी यंत्रे (उदा. कंबाइन हार्वेस्टर किंवा मोठ्या अश्वशक्तीचे ट्रॅक्टर्स) ही यंत्रे व अवजारांच्या खरेदीसाठी आर्थिक मदत मिळते.

राष्ट्रीय कृषी विकास योजना (Rashtriya Krishi Vikas Yojana - RKVY) ही केंद्र सरकारची अत्यंत महत्त्वाची आणि व्यापक योजना आहे. शेती आणि तिच्याशी संबंधित क्षेत्रांचा (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन इ.) सर्वांगीण विकास करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेची सुरुवात २००७ मध्ये झाली होती. कालांतराने त्यात सुधारणा करून त्याला 'RKVY-RAFTAAR' असे नाव देण्यात आले आणि नुकतेच केंद्र सरकारने याचे स्वरूप अधिक व्यापक करत 'पीएम राष्ट्रीय कृषी विकास योजना' (PM-RKVY) म्हणून मंजुरी दिली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे: शेती किफायतशीर करून शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावणे. पायाभूत सुविधांचा विकास: काढणीपूर्व आणि काढणीपश्चात लागणाऱ्या पायाभूत सुविधा (उदा. शीतगृहे, गोदामे, प्रक्रिया उद्योग) उभारणे. एकात्मिक शेती, मधमाशी पालन, आळिंबी (मशरूम) उत्पादन यांसारख्या पूरक व्यवसायांना चालना देऊन शेतीतील जोखीम कमी करणे. तरुण पिढीला शेतीकडे आकर्षित करण्यासाठी कृषी-स्टार्टअप्स आणि नवसंशोधनाला आर्थिक मदत करणे. ही या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत वैयक्तिक शेतकरी थेट केंद्राकडे अर्ज करू शकत नाही. केंद्र सरकार हा निधी राज्य सरकारला देते. त्यानंतर राज्य सरकार आपल्या कृषी विभागामार्फत विविध योजना राबवून शेतकऱ्यांना लाभ देते.

राज्य पुरस्कृत कृषियंत्रीकरण योजना ही महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत राबवली जाणारी एक महत्त्वाची योजना आहे. शेतीकामांमध्ये आधुनिक यंत्रांचा वापर वाढवून उत्पादन खर्च कमी करणे, मजुरांची टंचाई दूर करणे आणि शेतीची उत्पादकता वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शेतकऱ्यांना आधुनिक कृषी औजारे व यंत्रे खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत (अनुदान) देणे. पीक रचनेनुसार व प्रादेशिक गरजेनुसार दर्जेदार कृषी औजारे उपलब्ध करून देणे. कमी भूधारणा असलेल्या लहान व सीमांत शेतकऱ्यांपर्यंत आधुनिक तंत्रज्ञान पोहोचवणे. ही या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून अत्यंत पारदर्शकपणे राबविल्या जाणाऱ्या या तीनही योजनांतर्गत शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पॉवर टिलर, स्वयंचलित यंत्रे, पीक कापणीपश्चात अवजारे, प्राथमिक प्रक्रिया यंत्रे आणि भाडे तत्त्वावरील सेवा सुविधा केंद्र उभारणीसाठी एकूण किमतीच्या ४० ते ५० टयांपर्यंत मोठे आर्थिक अनुदान दिले जात आहे.

या कल्याणकारी योजनेसाठी चालू वर्षात 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर एकूण ३६ लाखहून अधिक अर्जांची निवड करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाने पुरेसा वेळ देऊनही विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रे अपलोड न केल्यामुळे सुमारे ३१ लाख लाभार्थ्यांचे अर्ज रद्द झाले. त्यानंतर पात्र ठरलेल्या २ लाख ३९ हजार ३३७ शेतकऱ्यांना कृषी विभागाकडून तातडीने पूर्वसंमती प्रदान करण्यात आली. यापैकी २ लाख ३२ हजार ७९७ शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष यंत्रसामग्रीची खरेदी पूर्ण करून त्यांची अधिकृत देयके पोर्टलवर यशस्वीरीत्या अपलोड केली असून, त्यांच्या खात्यात अनुदान वर्ग करण्याची प्रक्रिया आता युद्धपातळीवर सुरू आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रशासकीय शिस्तीची आणि दूरदृष्टीची साक्ष म्हणजे, कोणत्याही स्तरावर मानवी हस्तक्षेप न होता, थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीमुळे गरजू शेतकऱ्यांपर्यंत लाभ विनाभ्रष्टाचार पोहोचत आहे. कृषी अभियांत्रिकी संचालनालय पुणेचे संचालक अंकुश माने यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, प्रक्रियेतील प्रत्येक लाभार्थ्याला शासनस्तरावरून लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण कृषी विभाग अहोरात्र कार्यरत आहे. शासनाच्या या विशेष पुढाकारामुळे महाराष्ट्रातील शेती अबालवृद्धांसाठी केवळ कष्टाचे साधन न राहता एक 'स्मार्ट' आणि आधुनिक व्यवसाय बनण्याच्या दिशेने वेगाने पाऊल टाकत आहे.

**-प्रवीण डोंगरदिवे, उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग**

# रोटरी क्लब खोपोलीचा पदग्रहण सोहळा

## ◆ कविता खोपकर अध्यक्षपदी

**खोपोली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब खोपोलीच्या २०२६-२७ या वर्षासाठी कविता खोपकर यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मावळत्या अध्यक्ष सुनीता चव्हाण यांनी आपली अध्यक्षपदाची सूत्रे खोपकर यांच्या हाती दिली. पदग्रहण समारंभास रोटरी ३१३१चे माजी प्रांतपाल शीतल शाह, असिस्टंट गव्हर्नर रेश्मा कुरुप उपस्थित होते.



यावेळी पत्रकार जयवंत माडपे, नितीन भावे, सुधीर माने, प्रशांत गोपाळे, संजय पाटील, अनिल पाटील, तय्यब खान यांचा माजी प्रांतपाल शीतल शाह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रोटरी क्लब खोपोलीतर्फे वर्मा मेमोरियल अवॉर्ड वेध सह्याद्रीचे अध्यक्ष आकाश संजय घरडे यांना देण्यात आला. यावर्षी दहावीमध्ये जे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले व गणित या विषयात सर्वात जास्त मार्क मिळवले अशा सात विद्यार्थ्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. याचे पारितोषिक व रोख रक्कम माजी अध्यक्ष डॉ रवींद्र टिळक यांनी स्पॉन्सर केले होते. २०२५-२६ या वर्षात जे प्रोजेक्ट करण्यात आले, त्याचा रिपोर्ट सेक्रेटरी डॉ नलिनी रामस्वामी यांनी स्लाईड शो द्वारे दाखविला. मावळत्या अध्यक्ष सुनीता चव्हाण यांनी मला सर्व पदाधिकारी व सदस्यांनी चांगले सहकार्य केले, असे नूंद केले, तर नवनिर्वाचित अध्यक्ष कविता खोपकर यांनी पुढील २०२६-२०२७ या वर्षात काय नवीन प्रोजेक्ट करणार याची माहिती सर्वांसमोर मांडली.

कार्यक्रमास रोटरी क्लब लोणावळा, कर्जत, पाताळगंगा व पेण येथील कमिटी मेंबर्स उपस्थित होते तसेच इनरव्हील क्लब खोपोली, लायन्स क्लब, हास्य क्लब, ज्येष्ठ नागरिक संघ, रोट्रॅक्ट क्लब, इंट्रॅक्ट क्लब, ताराराणी ब्रिगेडचे पदाधिकारी, शाळेतील शिक्षक, रोटरी माजी अध्यक्ष, सदस्य व इतर हितचिंतक उपस्थित होते.

# इक्वेडोरची बाद फेरीत धडक

## चार वेळच्या चॅम्पियन जर्मनीचा पराभव

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील न्यूयॉर्कच्या स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या ग्रुप ईमध्ये इक्वेडोरच्या संघाने चार वेळच्या चॅम्पियन जर्मनीला २-१ असा पराभवाचा धक्का दिला. वर्ल्डकपस्पर्धेतील सर्वात मोठा उलटफेर करत या विजयासह इक्वेडोरने फिफा वर्ल्डकप स्पर्धेतील बाद फेरीत धडक मारली.



या सामन्यापूर्वी इक्वेडोरचा प्रवास खडतर राहिला होता. संघाला आयव्हरी कोस्टकडून १-० अशा पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर कुरासाओविरुद्धचा सामना गोलशून्य बरोबरीत सुटला. त्यामुळे बलाढ्य जर्मनीविरुद्ध इक्वेडोरला फारशी संधी दिली जात नव्हती, मात्र मुख्य प्रशिक्षक सेबास्टियन बेकासेसे यांच्या मार्गदर्शनाखाली संघाने टीकाकारांना सडेतोड उत्तर दिले.

सामन्याच्या सुरुवातीला जर्मनीच्या संघाने अपेक्षित आघाडी घेतली होती. फ्लोरियन विट्झच्या पासवर लेरॉय सानेने अप्रतिम फिनिशिंग करत जर्मनीला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र या गोलवर थोडा वादही झाला. इक्वेडोरच्या खेळाडूंनी फाऊलची मागणी केली. तथापि, याधक्क्यातून सावरत इक्वेडोरने केवळ नवव्या मिनिटालाच सामन्यात बरोबरी साधली. नील्सन अँगुलोने मिडफिल्डमधून मिळालेल्या पासचा अचूक फायदा उठवत लांब अंतरावरून अनुभवी गोलरक्षक मॅन्युएल नोयरला चकवत गोल डागला.

सामन्याचा निर्णायक क्षण ७७व्या मिनिटाला आला. उजव्या बाजूने मिळालेल्या कॉर्नरवर केविन रोड्रिगेजने अप्रतिम हेडर करत चेंडू गोलपोस्टसमोर फ्लिक केला. गोंझालो प्लाटाने संधीच सोनं करत इक्वेडोरला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ९० मिनिटांच्या खेळानंतर सात मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत जर्मनीने बरोबरीसाठी जोर लावला, पण शेवटी सर्वस्व पणाला लावले, मात्र इक्वेडोरच्या बचावफळीने भक्कम खेळ करत ही आघाडी कायम राखली आणि ऐतिहासिक विजयावर शिक्कामोर्तब केले. वर्ल्डकप स्पर्धेतील बाद फेरीत पोहचण्याची इक्वेडोरची ही केवळ दुसरी वेळ आहे. यापूर्वी २००६मध्ये त्यांनी ही किमया साधली होती.

या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण इक्वेडोरमध्ये जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. देशाच्या या अभूतपूर्व कामगिरीचा गौरव करत राष्ट्राध्यक्ष डॅनियल नोबोआ यांनी शुक्रवारी राष्ट्रीय सुट्टीची घोषणा केली.

# राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत आर्या मानेची चमकदार कामगिरी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ (सीबीएसई) व आकांक्षा फाऊंडेशनची विद्यार्थिनी आर्या माने हिने इंदूर (मध्य प्रदेश) येथे आयोजित राष्ट्रीय किकबॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारली.




राज्यातील विविध भागांतील खेळाडूंशी स्पर्धा करत आर्याने आपल्या कौशल्य, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर उल्लेखनीय यश मिळवले. उपांत्यपूर्व फेरीत तिला पराभव स्वीकारावा लागला असला, तरी राष्ट्रीय स्तरावर पोहचलेली तिची ही कामगिरी अत्यंत अभिमानास्पद मानली जात आहे. आर्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन करण्यात येत असून भविष्यात ती आणखी मोठी यशाची शिखरे सर करेल, असा विश्वास प्रशिक्षक सुधाकर अलदार यांनी यावेळी व्यक्त केला.

# जपान-स्वीडन सामना अनिर्णित; तरीही दोन्ही संघ बाद फेरीत!



**अर्लिंग्टन : वृत्तसंस्था**

जपान आणि स्वीडन यांच्यातील अटीतटीचा सामना १-१ असा बरोबरीत सुटला असला तरी, या निकालासह दोन्ही संघांनी फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे.

सामन्याच्या ५६व्या मिनिटाला रित्सू डोआनच्या असिस्टवर डायझेन माएदाने गोल करत जपानला १-० अशी आघाडी मिळवून दिली, मात्र जपानचा हा आनंद फार काळ टिकला नाही. अवघ्या सहा मिनिटांनंतर ६२ व्या मिनिटाला अँथनी एलांगाने प्रभावी गोल करत स्वीडनला १-१ अशी बरोबरी साधून दिली. सामन्याच्या अखेरच्या क्षणी स्वीडनला आघाडी घेण्याची संधी होती, परंतु जपानचा गोलकीपर झायन सुझुकीने अलेक्झांडर इसाकचा प्रयत्न हाणून पाडत सामना अनिर्णित राखला.

जपानने सलग तिसऱ्यांदा विश्वचषक स्पर्धेत गट फेरीतून बाद फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धेत जपानने आतापर्यंत एकूण सात गोल केले असून विश्वचषक इतिहासातील ही त्यांची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे.

दुसरीकडे स्वीडनसाठी ही बाद फेरी गाठण्याची परंपरा कायम राहिली आहे. १९९४नंतर विश्वचषकासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक वेळी स्वीडनने बाद फेरीत धडक मारली आहे.

# श्री चरणीने पूनम यादवला टाकले मागे

**नवी दिल्ली** : महिला टी-२० क्रिकेट जगतातील गोलंदाजीतील नवी क्वीन श्री चरणीने बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात आणखी एका विक्रमाला गवसणी घातली आहे. चार षटकात २१ धावा खर्च करताना श्री चरणीने दोन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. या सामन्यात पहिली विकेट घेताच पूनम यादवला मागे टाकत ती एका टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारताकडून सर्वाधिक विकेट्स घेणारी गोलदाज ठरली.

महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतील पहिल्या चार सामन्यांत १२ विकेट्स खात्यात जमा करत श्री चरणीने दक्षिण आफ्रिकेच्या नॉनकुलुलेकोची बरोबरी केली. २०२४-२५च्या हंगामात आफ्रिकेच्या गोलंदाजाने १२ विकेट्स घेतल्या होत्या. तिने टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत एका हंगामात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा विश्वविक्रम न्यूझीलंडच्या अमेलिया केरच्या नावे आहे. तिने २०२४-२५च्या हंगामात १५ विकेट्स् घेतल्या होत्या.

# भारतीय महिला संघाचे आव्हान कायम

## आयसीसी वर्ल्डकपमध्ये बांगलादेशवर मात



**मँचेस्टर : वृत्तसंस्था**

आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारत आणि बांगलादेश या दोन संघांमध्ये सामना पार पडला. ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने ८ गडी बाद १३६ धावा केल्या. भारताने हे लक्ष्य १६.५ षटकांत पाच विकेट्स राखून पार केले. भारताकडून शफाली वर्माने ५३ धावांची दमदार अर्धशतकी खेळी केली.

माफक धावांचा पाठलाग करताना स्मृती मानधना आणि शफाली वर्मा ही जोडी मैदानावर आली. स्मृती अवघ्या ८ धावा करून माघारी परतली. त्यानंतर शेफाली आणि यस्तिका भाटियाने मिळून भारतीय संघाचा डाव सावरला. यस्तिकाने २३ धावांचे योगदान दिले, तर शेफालीने ३४ चेंडूंचा सामना करत ५३ धावांची दमदार खेळी केली. ऋचा घोषने १२ चेंडूंमध्ये १० धावा केल्या. शेवटी जेमिमा रॉड्रिग्जने शेवटी १४ चेंडूंमध्ये २६ धावांची खेळी करून भारतीय संघाला विजयाच्या जवळ पोहचवले.

तत्पूर्वी या सामन्यात बांगलादेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय पूर्णपणे फसला. बांगलादेशला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. दिलारा अक्टेर अवघ्या ४ धावांवर माघारी परतली. जूआरिया फर्दोसने बांगलादेशकडून सर्वाधिक ३३ धावांची खेळी केली, तर सोबानाने २२ धावांचे योगदान दिले. याशिवाय कर्णधार निगर सुल्तााने ३२ धावांची खेळी केली. त्यामुळे बांगलादेशने २० षटकांअखेर ८ बाद १३६ धावा केल्या होत्या.

# ऑस्ट्रेलियाचे बाद फेरीतील स्थान निश्चित



**सँटा क्लारा : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलिया आणि पॅराग्वे यांच्यातील सामना गोलशून्य (०-०) बरोबरीत सुटल्यामुळे 'सॉकरूस' (ऑस्ट्रेलिया) संघाने फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. या निकालामुळे ऑस्ट्रेलियाने गटात दुसरे स्थान पटकावले असून पॅराग्वेही चार गुणांसह बाद फेरीत जाण्याची दाट शक्यता आहे.

सामन्यात दोन्ही संघांनी अत्यंत सावध पवित्रा स्वीकारला होता. ऑस्ट्रेलियासाठी जॅक्सन इर्विन आणि क्रिस्टियन व्होल्पाटो यांनी गोल करण्याचे प्रयत्न केले, परंतु पॅराग्वेचा गोलकीपर ऑर्लँडो गिलने चपळाईने बचाव करत त्यांचे मनसुबे उधळून लावले. सामन्याच्या ९०व्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाच्या जॉर्डन बॉसला सुवर्णसंधी मिळाली होती, मात्र त्याचा फटका गोलपोस्टच्या बाहेर गेला. संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले.

ऑस्ट्रेलियाने तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या नॉकआउट फेरीत प्रवेश केला आहे. यापूर्वी २००६ आणि २०२२मध्ये त्यांनी ही कामगिरी केली होती. ऑस्ट्रेलियाचा संघ ३ जुलै रोजी अर्लिंग्टन, टेक्सास येथे ३२ संघांच्या फेरीत मैदानात उतरेल. त्यांचा पुढील प्रतिस्पर्धी गट 'जी'मधील उपविजेता संघ असेल. दुसरीकडे पॅराग्वेचा बाद फेरीतील प्रवेश आता इतर सामन्यांच्या निकालावर अवलंबून असला, तरी सध्याच्या गुणतालिकेनुसार त्यांची स्थिती मजबूत आहे.

# स्कॉटलंडचा धुव्वा उडवत ब्राझील बाद फेरीत

**मियामी : वृत्तसंस्था**

स्टार फॉरवर्ड व्हिनिसियस ज्युनिअरने केलेल्या दोन धडाकेबाज गोल्सच्या जोरावर ब्राझीलने फिफा वर्ल्डकपमधील आपल्या अंतिम साखळी सामन्यात स्कॉटलंडचा ३-० असा धुव्वा उडवला. या दणदणीत विजयासह ब्राझीलने 'ग्रुप सी'मध्ये अव्वल स्थान पटकावत बाद फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.

हार्ड रॉक स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात ब्राझीलने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. सामन्याच्या ७व्या मिनिटाला स्कॉटलंडच्या बचावात्मक चुकीचा फायदा घेत व्हिनिसियस ज्युनिअरने पहिला गोल केला. त्यानंतर पहिल्या हाफच्या इंज्युरी टाईममध्ये (४५+ मिनिटाला) व्हिनिसियसने एक उत्कृष्ट हेडर मारत ब्राझीलची आघाडी २-० अशी मजबूत केली. उत्तरार्धात ६०व्या मिनिटाला ब्रुनो गुइमारेसच्या पासवर मॅथ्यूस कुन्हाने तिसरा गोल करून स्कॉटलंडच्या पुनरागमनाच्या सर्व आशा संपुष्टात आणल्या. स्कॉटलंडच्या स्कॉट मॅकटोमिने आणि कीरन टियरनी यांनी गोल करण्याचे प्रयत्न केले, पण ब्राझीलचा गोलरक्षक ॲलिसनने ते अपयशी ठरवले.








# नेदरलँड्सचा ट्युनिशियावर दणदणीत विजय

**कॅन्सस सिटी : वृत्तसंस्था**

पावसाळी हवामान आणि विजांच्या कडकडाटाच्या व्यत्ययानंतरही नेदरलँड्सने ट्युनिशियावर ३-१ असा विजय मिळवत फिफा विश्वचषकाच्या 'गट एफ'मध्ये अव्वल स्थान पटकावले आहे. या विजयासह डच संघाने नॉकआऊट फेरीसाठी आपली दावेदारी अधिक मजबूत केली आहे.



सामन्याच्या सुरुवातीपासूनच डच संघाने आक्रमक पवित्रा घेतला होता. ट्युनिशियाच्या खेळाडूंच्या चुकीचा फायदा घेत डच संघाने लवकर आघाडी मिळवली. सातव्या मिनिटाला ब्रायन ब्रॉबीने शानदार गोल करत संघाची आघाडी २-० अशी दुप्पट केली. ५४व्या मिनिटाला ट्युनिशियाच्या हाझेम मस्तौरीने एक गोल करत सामन्यात परतण्याचा प्रयत्न केला, मात्र डच खेळाडूंच्या वरचष्म्यामुळे ट्युनिशियाला अधिक यश मिळाले नाही. सामन्याच्या उत्तरार्धात अनिस स्लिमानने चुकून स्वतःच्याच गोलजाळ्यात चेंडू मारल्यामुळे नेदरलँड्सचा विजय सोपा झाला.

विश्वचषक कधीही न जिंकलेला संघ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नेदरलँड्सने यावर्षी आपल्या कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सलामीच्या सामन्यातील निराशाजनक कामगिरीनंतर डच संघाने ज्या पद्धतीने स्वीडन (५-१) आणि आता ट्युनिशियावर विजय मिळवला आहे, ते पाहता डच संघ विजेतेपदासाठी प्रबळ दावेदार असल्याचे मानले जात आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com